विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक पहिला । जानेवारी २०२४

सत्यमेव जयते



# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका । वार्षिक विशेषांक २०२३ प्रकाशन । क्षणचित्रे



मा.आ.जयंतराव पाटील, शामराव पाटील (अण्णा) संजय बनसोडे, प्रशीक पाटील आणि कार्यकर्ते (इस्लामपूर)




मा.आ.बाळासाहेब पाटील, डॉ.नितीन शिंदे, डॉ. सुदाम माने, मोहनराव जाधव आणि कार्यकर्ते (कराड)



डॉ.ठकसेन गोराणे, प्रल्हाद मिस्त्री, राजेंद्र फेगडे, अरुण घोडेराव, प्रा. आशा लांडगे आणि कार्यकर्ते (नाशिक)



माधव बावगे, आरविंद सोनटक्के, विजय परब, अमोल वाघमारे, महेंद्र राऊत, किरण वाळुंज आणि कार्यकर्ते (नवी मुंबई)




नंदकिशोर तळाशीलकर, सचिन थिटे, अनिल करवीर, आप्पा लोखंडे आणि कार्यकर्ते (पालघर)



डॉ. विश्वजित थुलकर, हर्षल मेश्राम, व्यंकटेश गायधने, विष्णूदास लोणारे, नितेश बोरबर आणि इतर कार्यकर्ते (भंडारा)




डॉ. शशांक कुलकर्णी, डॉ.अलकाताई कुलकर्णी, मानक चौधरी, प्रा.एच.एम.पाटील, कैलास भावसार, भुषण बाविस्कर आणि विनायक सावळे (शहादा)



डॉ.प्रदिप पाटकर, डॉ.अनिल डोंगरे, आरती नाईक, सुषमा बसवंत, अशोक निकम, मारुती पानशेतकर आणि कार्यकर्ते (पनवेल)

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
  पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
  ता.वाळवा जि.सांगली-४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  अरबाज पटेल
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले/कोल्हापूर
- **स्वागतमूल्य** : ₹ २०/-
- **पृष्ठ संख्या** : ४०

विज्ञान निर्भयता नीती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

आम्ही वारस विवेकाचे

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**

**वर्ष तिसरे । अंक पहिला । जानेवारी २०२४**

## अनुक्रमणिका

- **संपादकीय** ४
- **अभिवादन**
  भाई प्रा.डॉ. एन. डी. पाटील : सत्यशोधकी वाटसरू /डॉ. राम घुले ५
- **प्रासंगिक**
  स्वामी विवेकानंद : विश्वधर्म संकल्पनेचे अग्रदूत/जगदीश काबरे ११
  सावित्रीबाई : आद्य शिक्षिका /सुशीला म्हात्रे १५
- **बुवाबाजी**
  सोन्याच्या लोभापायी भोंदूबाबा पोलिसांच्या जाळ्यात/विष्णुदास लोणारे १८
  बागेश्वर बाबाची पळवाट अन् सरकारचा वरदहस्त/ विशाल विमल २०
- **जडणघडण**
  ज्येष्ठ साथींच्या प्रेरणेने, नव्या साथींना जोडत... / पुरुषोत्तम ठाकरे २४
- **आंतरराष्ट्रीय समन्वय**
  जन विज्ञान वेदिका /प्रा. डॉ. सुदेश घोडेराव २७
- **संघटन**
  निधी संकलनाचा नंदुरबार पॅटर्न / प्रा.परेश शाह ३०
- **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३४
- **गणितप्रेमी** / सूरज उर्मिला सुनील ३६
- **शब्दकोडे** / उत्तम जोगदंड ३७

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

# सामाजिक परिवर्तनासाठी राष्ट्रीय चळवळीचा अभ्यास व्हावा

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य म्हणजे व्यापक समाज परिवर्तनाची एक चळवळ आहे. अर्थातच डॉ नरेंद्र दाभोलकरांनी म्हटल्याप्रमाणे समाज परिवर्तनाची ही प्रक्रिया काही दशकांची नसून शतकांची आहे. इतिहासात या प्रक्रियेला राजकारणाच्या माध्यमातून सम्राट अशोकाने पुरोगामी गती दिली होती तर पुष्यमित्र शुंगाने प्रतिगामी गती दिली होती. मधल्या मोठ्या कालखंडात खूप मोठ्या प्रदेशात समाज परिवर्तनाची प्रक्रिया अवरुद्ध झालेली दिसते. समाजसुधारकांनी, वारकरी संप्रदायातील संतांनी समतेचा झेंडा रोवल्याने महाराष्ट्राला 'पुरोगामी' हे बिरूद आजपर्यंत मिरवता आले. आजची राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहता यापुढेही हे बिरूद महाराष्ट्राला असेच मिरवता येईल असे दिसत नाही.

एक देश म्हणून भारत या उपखंडात सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेने खऱ्या अर्थाने पुन्हा वेग घेतलेला दिसतो तो ब्रिटिशकालीन भारतात राष्ट्रीय चळवळ म्हणून उदयास आलेल्या काँग्रेसच्या स्थापनेपासूनच. राजकीय स्वातंत्र्याच्या मागणीबरोबरच एक देश म्हणून भारतीय समाजात सामाजिक सुधारणा केल्या पाहिजेत असे राष्ट्रीय चळवळीतील अनेक नेत्यांना वाटत होते. म्हणून काँग्रेसच्या अधिवेशनात राजकीय प्रश्नांच्या बरोबरच सामाजिक सुधारणांसाठी सामाजिक परिषद देखील भरवली जायची. सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आता राष्ट्रीय चळवळीच्या माध्यमातून देशभर घडणार होती. त्यामुळे या देशातील सनातनी प्रवृत्ती न बिथरतील तरच नवल. काँग्रेसच्या अधिवेशनातच भरणाऱ्या सामाजिक सुधारणांसाठीच्या सामाजिक परिषदेला सनातनी प्रवृत्तींचा इतका विरोध होता की त्यांनी सामाजिक परिषदेचा मंडपच जाळून टाकण्याची धमकी दिली होती.

टिळकांच्यानंतर राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले. ज्या सामान्य भारतीयाला शतकानुशतके राजकारणात कधीच स्थान नव्हते, त्याला सत्याग्रह, पदयात्रा, असहकार, उपवास, चरखा अशा काही उपक्रमांच्या माध्यमातून महात्मा गांधींनी या चळवळीत जोडून घेतले. त्यातूनच त्याला आपल्या राजकीय, सामाजिक हक्कांची जाणीव होत गेली. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रिया देखील राष्ट्रीय चळवळीत उतरल्या. त्यातूनच सामाजिक सुधारणांच्या प्रक्रियेकडे प्रखरतेने लक्ष वेधले गेले. राजकीय समतेबरोबरच जाती, धर्म, लिंग, प्रदेश किंवा अशा प्रकारचे (गरीब-श्रीमंत देखील) कोणतेही भेदभाव न करणारी 'एक व्यक्ती, एक मत' अशी सामाजिक समतेची मागणी १९२८ च्या 'नेहरू रिपोर्ट'ने केली. अशाप्रकारे या राष्ट्रीय चळवळीतूनच काही सामाजिक मूल्ये देखील निर्धारित होत गेली; ज्यामुळे सामाजिक परिवर्तनासाठी एक अनुकूल पृष्ठभूमी तयार होत गेलेली आपल्याला दिसून येते.

भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा झाली; स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीसाठी राज्यघटना समिती स्थापित झाली. तिची पहिली बैठक आजच्या सेन्ट्रल हॉलमध्ये (त्यावेळी त्यास Constitution Hall म्हटले जायचे) दिनांक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. मात्र ज्या देशासाठी ही राज्यघटना लिहिली जायची होती तो देश मात्र अजूनही आकाराला आलेला नव्हता; त्याच्या भौगोलिक सीमा निश्चित झालेल्या नव्हत्या. राष्ट्रीय चळवळीच्या माध्यमातूनच सामान्य भारतीयाने या चळवळीतील नेत्यांना बळ दिल्यानेच ब्रिटिशांकडून सत्तांतर होतांना ५५० हून अधिक संस्थानांचे विलीनीकरण त्यांना करून घेता आले. त्यानंतरच स्वतंत्र भारतासाठीच्या राज्यघटनेची निर्मिती करणे शक्य झाले.

२६ जानेवारी १९५० ला भारतीयांनी स्वीकारलेल्या राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता, समाजवाद इत्यादी मूल्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला अधिक गती मिळाली. त्यामुळे भारताची राष्ट्रीय चळवळ केवळ राजकीयच नव्हती; तर त्यातून सामाजिक परिवर्तनासाठीची अनेक मूल्ये देखील उदयास आलेली आहेत. आज याच मूल्यांची पायमल्ली होतांना दिसते आहे. म्हणून प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने प्रत्येक भारतीयाने भारताच्या स्वातंत्र्यासाठीची राष्ट्रीय चळवळ अभ्यासण्याचा संकल्प केला तर मूल्यांचा होणारा ऱ्हास थांबवण्याची वाट निश्चितच सापडेल.

नववर्षाच्या सर्वांना हार्दिक सदिच्छा!

**प्रल्हाद मिस्त्री**
अतिथी संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# भाई प्रा.डॉ. एन. डी. पाटील : सत्यशोधकी वाटसरू

**प्रा. डॉ. रामचंद्र घुले,** इस्लामपूर
७९७२२७४७३४

अंधश्रद्धा व जातीनिर्मूलनातून शोषणमुक्त, समताधिष्ठित समाजनिर्मितीची गरज ओळखणारे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एकमेव राजकारणी म्हणजे प्रा. डॉ. भाई एन. डी. पाटील होत. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा, कार्ल मार्क्स आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांच्या समन्वयातून त्यांची वैचारिक भूमिका तयार झाली. स्पष्टवक्ता, अफाट निर्णयक्षमता, प्रतिपक्षाला निरुत्तर करणारी तर्कशुद्ध मांडणी, शोषित-पीडित-कष्टकरी व शेतकऱ्यांच्याबद्दल आत्यंतिक जिव्हाळा, महाराष्ट्रभर विखुरलेल्या व अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्व पुरोगामी चळवळींची हाक येईल तेव्हा धावून जाण्याचा स्वभाव, एकजात सर्व अडल्यानडलेल्यांच्या हिताचा विश्वस्त व अन्यायाची चीड हे जगण्याचे त्यांचे सूत्र होते. राजकारणातील खुर्चीपेक्षा रस्त्यावरील लढाईने दीनदुबळ्यांचे प्रश्न सोडविता येतात यावर त्यांचा ठाम विश्वास होता. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात विवेकाचा अंकुश ठेवणारे एक परखड बुद्धिप्रामाण्यवादी व्यक्तिमत्त्व म्हणून भाई एन. डी. पाटील ओळखले जातात. त्यांच्या 'संघर्ष यात्रे'त शेवटचा गरीब माणूस हा केंद्रबिंदू होता. 'नाही रे', (अभावग्रस्त) वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सर्वव्यापी लोकलढे उभे केले.



**जन्म, बालपण व शिक्षण :** नारायण ज्ञानदेव तथा एन.डी. पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात 'ढवळी' या छोट्याशा खेड्यात वडील ज्ञानदेव व आई कृष्णाई यांच्या पोटी ५ जुलै १९२९ रोजी शेतकरी कुटुंबात झाला. पांडुरंग धोंडी परीट नावाच्या शिक्षकांनी नारायणाच्या शिक्षणाचा त्यांच्या घरी आग्रह धरल्यामुळे गावच्या मंदीरातील शाळेत लहानग्या नारायणाचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले. शंकर रामचंद्र माळी या सत्यशोधकी विचारांच्या शिक्षकांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला. बागणीच्या शाळेतील बापूसाहेब पिरजादे हे अतिशय चांगले आणि मायेची ऊब देणारे हेडमास्तर होते. याचबरोबर आष्ट्याच्या शाळेतील वेताळराव खैरमोडे यांचाही मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला. डॉ. आंबेडकरांचे चरित्र लिहिणारे चांगदेव खैरमोडे यांचे ते पुतणे होते. त्यांनीच राष्ट्रीय चळवळीचे बाळकडू नारायणाला पाजले. त्यांच्यामुळे वाचन व ज्ञानार्जनाची आवड नारायणामध्ये निर्माण झाली.

दलितांना बंदी असलेली घरची विहीर जोपर्यंत त्यांना खुली करणार नाहीत तोपर्यंत घरात पाऊल ठेवणार नाही अशी भूमिका घेऊन शेवटी त्यांनी घरची विहीर दलितांना खुली करून दिली. राजाराम महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. आप्पासाहेब पवार व प्रा. डॉ. व्ही. के. गोकाक यांच्यासारख्या व्यासंगी व कर्तबगार प्राध्यापकांच्या तालमीमध्ये त्यांची जडणघडण झाली. भाई दाजीबा देसाई यांनी कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी संघाची स्थापना केल्यावर त्यामध्ये एन. डी. यांनी जॉईंट सेक्रेटरी म्हणून काम केले. पुढील काळात सामाजिक जीवनात त्यांची 'एनडी' अशी ओळख निर्माण झाली.

**वैचारिक जडणघडण व तत्त्वनिष्ठा :** एनडींच्या जडणघडणीमध्ये त्यांच्या आई कृष्णाई यांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचार व कार्याची प्रेरणा त्यांना मिळाली. सामाजिक समता, मानवतावाद आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा या मूल्यांचे संस्कार त्यांना विद्यार्थीदशेतच राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून मिळाले. सन १९४३ मध्ये एनडी गावात राष्ट्र सेवा दलाची शाखा चालवायचे.

लाल निशाण पक्षाचे संतराम पाटील आणि समाजवादी प्रवाहाचे बापूसाहेब पाटील यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. कर्मवीर अण्णांचे पट्टशिष्य प्राचार्य ए.डी. आत्तार व बॅरिस्टर पी.जी.पाटील यांच्यासारख्या थोर शिक्षकांचा सहवास त्यांना लाभला. स्पष्टवक्तेपणा, पहाडी कणखर आवाज व उंचपुऱ्या मध्यम बांध्यामुळे ते सर्वांचे लक्ष वेधून घेत असत. कार्ल मार्क्सचे 'दास कॅपिटल' त्यांनी वाचले होते. कोणाचीही भीडभाड न ठेवता आपले विचार स्पष्टपणे मांडत. त्यांचे भाषण चार-पाच तास चाले. त्यांची शारीरिक, बौद्धिक व मानसिक क्षमता अचाट होती. आपल्या तर्कशुद्ध युक्तिवादाने ते भल्याभल्यांना निरुत्तर करत. अंधश्रद्धा दूर करण्यासाठी लोकशिक्षणाबरोबरच प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतच्या अभ्यासक्रमात 'इहवादी' विचार आले पाहिजेत. अभ्यासक्रमात शहीद भगतसिंग यांचे 'मी नास्तिक का आहे' या पुस्तकासारखे साहित्य आले पाहिजे, असे ते म्हणत. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या तत्त्वज्ञान व विचारांची बैठक 'वर्गवादाचा सिद्धांत' मांडणाऱ्या 'मार्क्स-लेनिनवाद' आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वर्णवर्चस्व-जातिभेद-विषमता विरोधातून झालेली होती. वर्ग-वर्ण-जाती-लिंग विषमतेच्या विरोधाचा समग्र सुंदर मिलाफ त्यांच्या विचार व कार्यात दिसून येतो. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. याशिवाय शेतकरी कामगार पक्षातील बेळगावचे भाई दाजीबा देसाई यांच्या विचारांचा एनडींच्यावर मोठा प्रभाव होता. तत्त्वांशी तडजोड करणे त्यांना अजिबात मान्य नव्हते.

'पुलोद' सरकारमध्ये सहकार मंत्री झाल्याबरोबर त्यांनी जाहीर केले की, 'मंत्री या नात्याने ते एकाही भूमिपूजन समारंभाला उपस्थित राहणार नाहीत.' अशी जाहीर भूमिका घेणारे ते एकमेव मंत्री असावेत. कोणत्याही अंधश्रद्धेला त्यांच्या जीवनात कुठेच स्थान नव्हते. लोकलज्जेस्तव लोकानुनय त्यांच्या तत्त्वात बसत नसे. शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केल्यापासून पक्षाच्या विचारांशी जुळलेली नाळ त्यांनी अखेरपर्यंत जोडून ठेवली. परिस्थितीच्या साऱ्या हेलकाव्यात त्यांची पक्षनिष्ठा कधीच दुभंगली नाही. ते म्हणत, पक्षाने जो मार्ग स्वीकारला त्याच्याशी कधीच प्रतारणा केली नाही. इतर सगळ्या पक्षांनी कधी ना कधी जातीयवादी पक्षांशी तडजोडी केल्या पण शेकापने ते कधीच केलेले नाही. पक्षाने मरण पत्करले; पण जातीयवादी शक्तींशी स्वार्थी हेतूने राजकीय हातमिळवणी केली नाही; याचा त्यांना सार्थ अभिमान वाटत असे. कोणत्याच पक्षाशी युती न केल्याने सामाजिक शुचितेचे बीज समाजात नक्की रुजेल, असा विश्वास त्यांना वाटत असे.

'वैचारिक तळ' राखले तर कालांतराने 'राजकीय तळ'ही परत मिळवता येतात, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. श्रमजीवी, कष्टकरी, शेतकरी व शेतमजूर यांचे अठराविश्व दारिद्र्य त्यांनी जवळून अनुभवले व पाहिले होते. या दारिद्र्याचे मूळ शोधून काढून ते उखडून टाकण्यासाठी त्यांनी महाराष्ट्राच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास करून धरणे, आंदोलने, उपोषणे, प्रबोधन व व्याख्याने देऊन लोकचळवळ उभी करण्याचे काम आयुष्याच्या अखेरपर्यंत केले. अज्ञान आणि विषमतेच्या विरोधात भारतीय सत्यशोधक पायावर उभी असणारी क्रांतिकारी बदलाची वैश्विक शास्त्रीय मार्क्सवादी दृष्टी सोबत ठेवावी लागेल. व्यवस्थेमध्ये आमूलाग्र परिवर्तनाची ही पूर्वअट आहे, असे ते म्हणत. प्रचंड वाचन, लेखन व चिंतन यातून त्यांची तत्त्वनिष्ठा कणखर बनली.संपूर्ण जीवनभर त्यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या शिकवणीनुसार सत्यशोधकी विचाराने वाटचाल केली. जातिअंताच्या लढाईत ते अग्रभागी राहिले. ते नेहमी म्हणत असत, या देशाचे सर्वात जास्त नुकसान कशामुळे झाले तर या देशात असलेल्या जातिप्रथेमुळे. दणकट शरीरयष्टी, पोलादी मन व खंबीर विचार यातून त्यांची भाषणे उच्च स्वरात घणाघाती होत असत. त्यांनी भाषणात कधीही अपशब्द वापरला नाही.

**रयत शिक्षण संस्था आणि प्रा. एन. डी. पाटील :** कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उदात्त ध्येयाने रयत शिक्षण संस्था स्थापन केली होती. अण्णांनी आपल्या पश्चात रयतची जबाबदारी एनडी यांच्यावर सोपविली. कर्मवीर अण्णांचा विचार व कार्याचा वारसा पुढे नेण्याचे कार्य त्यांनी मोठ्या निष्ठेने केले. संस्थेच्या अध्यक्षपदी आल्यानंतर त्यांनी अनेक योजनांचे पुनरूज्जीवन केले. बहुजन समाजातील शेतकऱ्यांची मुले शिकावीत, आधुनिक जगाला सामोरे जाणारी ज्ञानी व बुद्धिवादी व्हावीत ही त्यांची भूमिका होती. कर्मवीर अण्णांच्या

कार्याचा वसा आणि वारसा त्यांनी पुढे चालविला. संस्थेतून त्यांनी कधीच कसले मानधन घेतले नाही. ‘शिक्षण हे राष्ट्राने करावयाचे धर्मादाय काम नसून राष्ट्राच्या भविष्यकालीन विम्यासाठी केली जाणारी ती एक फलदायी गुंतवणूक आहे,’ असे त्यांचे मत होते.

रयत शिक्षण संस्थेमध्ये एनडींनी धर्मनिरपेक्षता, विवेकवाद व विज्ञानवादाची पेरणी केली. आपले विभागीय अधिकारी, प्राचार्य व मुख्याध्यापकांना ते या संदर्भात सूचना देत असत. ते म्हणत, ‘आपला भारत धर्मनिरपेक्ष देश आहे. व्यक्तींनी स्वतःच्या घरी धर्मपालन अवश्य करावे. आपल्या संस्थेच्या कोणत्याही शाखेमध्ये कोणत्याही धर्माच्या देवी-देवतांचे पूजन करू नये. धर्मनिरपेक्षतेचे संस्कार दृढ होण्यासाठी आपल्या शाखेत ईशस्तवन वगैरे गायले जाऊ नये, याची काळजी घ्या. त्याऐवजी स्वातंत्र्याचा जयजयकार करणारी व अंधश्रद्धा निर्मूलनाची गाणी आणि विज्ञानगीते गायली जावीत. आपले विद्यार्थी दैववादी न बनता प्रयत्नवादी बनले पाहिजेत, याची काळजी घ्या. आपल्या शाखेमध्ये कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेची हळद-कुंकू लावून, उदबत्ती पेटवून, नारळ फोडून पूजा केली जाते, ती बंद करा, पुष्पांजली वाहण्यास हरकत नाही. नारळ फोडणे म्हणजे अण्णांच्या प्रतिमेसमोर आपण ‘नरबळी’ देणे. आपण अण्णांच्या प्रतिमेची पूजा करतो, त्यावेळी आपण त्यांना देव बनविण्याची प्रक्रिया सुरू करतो. एकदा अण्णांना देव केले की, त्यांच्या त्यागाचा आपणाला विसर पडतो; अण्णा महामानव होते. एन. डी. पाटील यांच्या विचार व कृतीचा आदर्श भारतातील सर्वच संस्थाचालकांनी घेणे गरजेचे आहे.’

‘रयत’ मधल्या शाळेतील म्हटले जाणारे गायत्रीमंत्र त्यांनी बंद केले. गणेशोत्सव बंद केले. देव-देवतांच्या प्रतिमा काढून टाकल्या. ‘परिवर्तन’ व्यसनमुक्ती केंद्राच्या मदतीने काही सेवक व्यसनमुक्त केले. आंतरजातीय विवाह करणाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले; त्यांना आधार दिला. 'होळी लहान करा, पोळी दान करा' यासारखे उपक्रम राबविले. त्यांनी महात्मा जोतीराव फुले यांना आपल्या गुरुस्थानी मानले होते. संस्थेत वशिलेबाजी, डोनेशन व इतर कोणतेही गैरप्रकार खपवून न घेता गुणवत्तेवरच शैक्षणिक प्रवेश व नोकऱ्यांना प्राधान्य दिले. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असताना बी.एड. व डी.एड. मध्ये प्रथम आलेल्या पाच विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी पत्र पाठवून नोकरी दिली. संस्था रयतेची आहे, अण्णांची आहे, येथे गैरप्रकार चालणार नाहीत; संस्थेचा कारभार भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक असलाच पाहिजे हा त्यांचा दंडक होता. ‘मुलाखत’ हा भ्रष्ट व्यवहार आहे या धारणेतून त्यांनी मुलाखत न घेता गुणवत्तेच्या व राखीव जागांच्या आधारे नियुक्त्या दिल्या. त्यामुळे हजारो गोरगरीब शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे कल्याण झाले. शिक्षण व संस्थेचे व्यापारीकरण होऊ नये, सार्वत्रिक व मोफत प्राथमिक शिक्षण सर्व मुलांना मिळावे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये. दुर्गम ग्रामीण भागात आश्रमशाळा, दहावी बारावी नापास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केंद्र तसेच ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी शिक्षण त्यांनी सुरू केले. चळवळीतील कार्यकर्ता अभ्यासू असावा, यासाठी त्यांनी ‘कार्यकर्ता अभ्यास शिबिरे’ घेतली. स्वतःची शिक्षण संस्था न वाढविता कर्मवीर अण्णांची रयत शिक्षण संस्था वाढविली. ‘रयत माझा श्वास आहे’ असे ते नेहमी म्हणत. ‘रयत’ हे श्रमिक विद्यापीठ व्हावे हे त्यांचे स्वप्न होते. त्यांनी ‘लक्ष्मीबाई पाटील शिष्यवृत्ती योजना’, ‘सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना’ व ‘संस्था कृतज्ञता निधी’ स्थापन करून दुर्बल शाखांचा विकास केला. संस्थेसाठी जमिनी व देणग्या मिळवल्या, शाखांचे प्रश्न सोडवले. त्यांनी कधीही एक पैशाचा सुद्धा स्वतःसाठी वापर केला नाही. ‘ज्याने विठ्ठल मात्रा घ्यावी त्याने पथ्ये सांभाळावी’ हे त्यांचे सूत्र होते.

**जनआंदोलनांमागील भूमिका :** गत ६० वर्षात महाराष्ट्रात झालेल्या विविध प्रकारच्या सामाजिक व राजकीय चळवळीत एनडींनीं मोठ्या हिरीरीने सहभागी होऊन त्या यशस्वी केल्या आहेत. एनडी आणि चळवळ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणावे लागेल. चळवळीला जात-पात-पक्ष अशी कोणतीच बंधने नसतात असे ते मानत. वास्तवाची अभ्यासपूर्ण जाणीव, परखड बुद्धिवाद, स्पष्ट भूमिका, प्रतिपक्षाला निरुत्तर करणारी तर्कशुद्ध मांडणी, शोषित- कष्टकरी-शेतकरी यांच्याबद्दलचा जिव्हाळा, महाराष्ट्रातील सर्वच पुरोगामी चळवळींचा विश्वस्तपणा तसेच भारदस्त, बुलंद, वक्तृत्वशैली ही त्यांच्या नेतृत्वाची खास वैशिष्ट्ये होती. प्राचार्य विश्वास सायनाकर त्यांच्याविषयी म्हणतात, ‘चळवळी तितक्या वाढवाव्या, लढवाव्या, कष्टकरी

शेतकरी जागवावा, लढता करावा हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. संघर्षाच्या रणांगणावर अखंड लढणारा हा आघाडीचा अजेय योद्धा होता.'

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सहभाग :** संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी १९५८ सालापासून सक्रिय सहभाग घेतला. डाव्या पक्षाच्या सहकार्यातून त्यांनी हा प्रश्न सतत ऐरणीवर ठेवला. सीमा भागातील दहा लाखांवरील मराठी भाषक प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासंबंधीचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत नेले गेले. त्यापाठीमागे एन. डी. पाटील यांची मोठी भूमिका होती. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात मोर्चे, धरणे व आंदोलनात सहभागी होऊन त्यांनी अनेकदा तुरुंगवास भोगला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये साऱ्या पुढाऱ्यांच्या सरकारवर आग ओकणाऱ्या भाषणांपेक्षा शाहीर अमर शेख यांच्या डफाने व अण्णाभाऊंच्या वीरश्रीयुक्त गीतांनी प्रभावी काम केले, असे एन. डी. पाटील सांगत असत.

२९ मार्च २००४ मध्ये सीमाप्रश्नाचा दावा सर्वोच्च न्यायालयात त्यांच्याच सल्ल्यानुसार दाखल करण्यात आला. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते सीमा लढ्यास मार्गदर्शन करीत राहिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत असणारी घोषणा 'समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र झालाच पाहिजे' यासाठी त्यांनी सातत्याने आयुष्याच्या अखेरपर्यंत आग्रह धरला.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती, समाजवादी प्रबोधिनी व आंबेडकर अकादमी अशा अनेक पुरोगामी संस्था व चळवळींमध्ये त्यांनी नेहमीच सक्रिय सहभाग घेतला. जातिअंत व स्त्री-पुरुष विषमतेचा अंत केल्याशिवाय आपल्याकडे वर्गीय वास्तवाची, वर्गलढ्याची आणि पायाभूत वर्गातीत व्यवस्थेची कल्पना करता येत नाही, हे त्यांनी ओळखले होते. भाई डॉ. एन. डी. पाटील यांच्या आंदोलनांची वैशिष्ट्ये म्हणजे सर्व आंदोलने शांततापूर्ण व सनदशीर मार्गाने होत असत. शासकीय कार्यालयांची तोडफोड, दगडफेक असा कोणताही अनुचित व विघातक प्रकार न करता आंदोलने त्यांनी यशस्वी केली आहेत.

आपले संपूर्ण जीवन दलित, पीडित, शोषित, वंचित, कष्टकरी, शेतकरी व शेतमजुरांसाठी समर्पित केले. आपले जीवन व चळवळ यामध्ये कधीही अंतर ठेवले नाही. नैतिकता व चारित्र्य या दोन गोष्टींमध्ये त्यांनी पारदर्शकता ठेवली. पैशाला कधीही किंमत न देता आपले आयुष्य दीनदुबळ्यांच्या कल्याणार्थ खर्च केले. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व गणपतराव देशमुख या आपल्या जुन्या सहकाऱ्यांच्या मदतीने आयुष्यभर धरणग्रस्त, दुष्काळी शेतकऱ्यांचे पाण्यासंबंधी आंदोलन करीत राहिले.

**अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य :** भाई एन. डी. पाटील 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'चे संस्थापक अध्यक्ष होते. समितीच्या स्थापनेपासून त्यांच्या निधनापर्यंत अध्यक्षपदावर होते. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ नरेंद्र दाभोलकर यांना ते आपला नेता मानत असत. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात मार्क्सवादाच्या अध्ययनाची व सत्यशोधकी विचारांची जाणीव एनडींनी करून दिली. युरोपमधल्या प्रबोधन कालखंडाचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. महाराष्ट्रातील सत्यशोधकी समाजसुधारकांची परंपरा हा तर त्यांच्या केवळ अभ्यासाचाच नव्हे तर जिव्हाळ्याचा विषय होता. महाराष्ट्राच्या राजकारणात राहूनही त्यांनी राजकारणाला प्रभावित करणाऱ्या देवधर्म, पूजापाठ व कर्मकांडे याबद्दल रोखठोक भूमिका घेतली होती. अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन व सत्यशोधकी जाणिवा रूजविण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासाठी 'सत्यशोधक प्रज्ञा प्रकल्प' राबविला.

कोल्हापूर येथील अंबाबाईच्या मंदिरात एका महाप्रचंड यज्ञाचा कर्मठांनी घाट घातला तेव्हा एनडी व कॉ. गोविंदराव पानसरे यांनी या विरोधात उभे राहून त्यातील फोलपणा उघड केला. अंधश्रद्धा, कर्मठता व सनातन्यांच्या विरोधात ते लढत राहिले. देशात हिंदूराष्ट्र लादू पाहणाऱ्या फॅसिस्ट शक्तींशी ते दोन हात करीत राहिले. सत्यशोधकी विचारधारा, आदर्श नैतिकता, जनसंग्रह व निर्भयता ही त्यांच्या लढ्याची आयुधे होती. मोर्चा, तुरुंग, धरणे व आंदोलने हेच त्यांचे जीवन होते. वाढत्या शेतकरी आत्महत्यांबद्दल त्यांनी सखोल चिंतन केले.

शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांच्या विरोधात एका स्वतंत्र कायद्याची निर्मिती शासनाने करावी यासाठी त्यांनी महाराष्ट्र सरकारला आवाहन केले. त्यासाठी 'किमान समान कार्यक्रमा'साठी भाई एन. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. या समान

किमान कार्यक्रमात त्यांनी आवर्जून अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करण्याच्या कलमाचा समावेश केला. विधानसभा व विधान परिषदेत हा कायदा मंजूर होण्यासाठी एक सक्षम फळी त्यांनी तयार केली.हा कायदा मंजूर व्हावा यासाठी डॉ नरेंद्र दाभोलकर, अविनाश पाटील, माधव बावगे इत्यादी कार्यकर्त्यांच्यासोबत मोठा लढा उभा केला. सातत्याने निवेदने देणे, धरणे आंदोलने, विविध प्रकारच्या मोहिमा व कार्यक्रम तसेच परिषदा घेऊन कायदा मंजूर होण्यासाठी पाठपुरावा केला. त्यामुळेच भारतात प्रथमच अंधश्रद्धा निर्मूलनासाठी स्वतंत्र कायद्याची राज्यात निर्मिती झाली.

शनिशिंगणापूर येथे शनी देवाच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश निषिद्ध मनाला जात होता. या विरोधात एनडी, डॉ. नरेंद्र दाभोलकर, डॉ. श्रीराम लागू, डॉ. बाबा आढाव व व्यंकटराव रणधीर आदींच्या नेतृत्वाखाली सलग पाच वर्षे प्रबोधन सत्याग्रह सुरू होता. या सत्याग्रहामध्ये त्यांना नगरच्या जेलमध्ये दोन दिवस कारावास भोगावा लागला. महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीसाठी 'विवेक वाहिनी' हा उपक्रम प्रत्येक महाविद्यालयामध्ये सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनास आग्रह धरण्यात आला. त्यामुळे आज महाविद्यालयांमध्ये हा उपक्रम सुरू आहे. यासाठी त्यांनी सभा-संमेलने बैठका मोठ्या तळमळीने बोलविल्या व त्यांना मार्गदर्शन केले. आमदारकीची निवडणूक जिंकल्यानंतर कोल्हापूर येथे होळीला नारळ देण्याचे व अंबाबाईचे दर्शन घेण्याचे त्यांनी नाकारले. त्यांनी आपल्यातील सत्यशोधक प्रज्ञावंत सतत जागा ठेवला होता.

वैज्ञानिक जाणिवा कृति परिषदेच्या समारोपप्रसंगी ते म्हणाले की, 'समाज जीवनाशी सांगड घालता यावी अशा पद्धतीच्या अभ्यासक्रमाची सध्या गरज असल्याने क्रमिक अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल करून त्यातून विज्ञाननिष्ठा कशी वाढवता येईल याचा विचार करण्याची नितांत गरज आहे.' धर्माच्या आडून लोकांना दैववादात व कर्मकांडात गुंतवले जाते. त्याबद्दल ते म्हणायचे, 'धर्म ही अत्यंत व्यक्तिगत आणि निव्वळ खाजगी बाब आहे. धर्माच्या आधारे कुणालाही शिक्षण, आरोग्य, निवारा व रोजीरोटीची व्यवस्था झालेली नाही. उलट जेवढं रक्त या पृथ्वीवर सांडले त्यात सर्वात जास्त रक्त हे देव आणि धर्माच्या नावावर सांडले आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्र हेच दीनदुबळ्या समाजाच्या हिताचा विचार करू शकते. उलट धर्म हा माणसामाणसात कलह निर्माण करू शकतो.' बुद्धिवादी, विवेकनिष्ठ व धर्मनिरपेक्ष असणाऱ्या एन. डी. पाटील यांनी एक आदेश काढून संपूर्ण रयत शिक्षण संस्थेच्या शाखांमधील देवदेवतांचे फोटो तसेच गुरुवारच्या आरत्या बंद करून टाकल्या.डॉ. नरेंद्र दाभोलकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या खुनाबद्दल त्यांना प्रचंड संताप होता. त्यांच्या खुन्यांच्या शोधाचा पाठपुरावा करण्यासाठी एनडी यांनी मुख्यमंत्र्यांना अनेक पत्रे लिहिली. त्यांनी सत्यनारायणाला कधीही हात जोडले नाहीत. त्यामुळे 'विज्ञानाचा पदवीधर सत्यनारायण घालत असेल व मी कुलगुरू झालो, तर त्याची विज्ञानाची पदवी आपोआप रद्द करण्याचा आग्रह धरेन,' असे ते नेहमी सांगत असत.

एनडी सर हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे फ्रेंड, गाईड आणि फिलॉसॉफर आहेत, असे डॉ नरेंद्र दाभोलकर नेहमी त्यांच्याविषयी म्हणत असत. येणाऱ्या प्रसंगाला पडेल ती किंमत देऊन संघर्ष करण्याची तयारी, राजकारणात शब्दाचा पक्केपणा, त्याकरिता व्यक्तिगत जीवनात कितीही संकटे आली तरी न डगमगता त्याला तोंड देणे, स्वतःपेक्षा पक्ष व समाज मोठा आहे ही भूमिका घेऊन काम करणे, राजकीय व व्यक्तिगत जीवनात कोणतीही तडजोड न करता पक्षाच्या व समाजाच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, तसेच व्यक्तिगत त्यागमय जीवन, साधी राहणी, विचार आणि आचार यांच्यामध्ये तसूभरही फरक न करता सार्वजनिक जीवनात काम करणे त्यांनी आयुष्यभर अखंडपणे जपले.

एक अभ्यासू आमदार म्हणून त्यांनी २० वर्षे विधान परिषदेवर आणि ५ वर्षे विधानसभेत अशी २५ वर्षे काम केले. एनडी हे ज्येष्ठ राजकीय नेते शरद पवार यांचे मेहुणे होते. राजकारणात ते एकमेकांच्या विरोधात बसले. शरद पवार म्हणत, 'आमच्याकडून काही चूक झाली तर ते झोडायलाही मागेपुढे पाहत नसत.' कोपरगाव येथील एका कार्यक्रमात त्यांनी शरद पवार यांच्या राजकारण व भूमिकेवर सडकून टीका केली होती. राजकारणात ६० वर्षे राहूनही त्यांचे कट्टर विरोधकही भाईंवर भ्रष्टाचाराचे, अनैतिक व्यवहाराचे आरोप करू शकले नाहीत, ही त्यांची नैतिकता होती. कर्मवीर अण्णांचे 'मोडेन पण वाकणार नाही' हे तत्त्व राजकारणासह जीवनाच्या अनेक

क्षेत्रात एनडींनी अंगीकारले. समताधिष्ठित समाजरचनेच्या निर्मितीसाठी त्यांनी राजकारण केले. देशाच्या सत्तेवर सर्व नागरिकांचा समान हक्क आहे. विकासाची फळे गोरगरिबांपर्यंत पोहोचावीत यासाठी त्यांचे राजकारण होते. परिघाबाहेरच्या उपेक्षित वंचितांचा आवाज बनून त्यांनी राजकारण केले.

एक सत्यशोधक, एक समाजसुधारक, एक शिक्षक, एक राजकारणी म्हणून एन.डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग होते. शुद्ध चारित्र्य, समाजजीवनाच्या अंगांचा सर्व बाजूंनी सखोल अभ्यास करण्याची वृत्ती, तत्त्वज्ञान व विचारसरणीची अतूट बांधिलकी, त्यागी आणि समर्पित जीवन, शेतकरी, कामगार व शोषित जनतेशी बांधिलकी आणि त्यासाठी अपार कष्ट उपसण्याची तयारी भाई एन.डी. पाटील यांच्याकडे होती. जनआंदोलनांमध्ये कोणाच्या रागलोभाची पर्वा न करता मिळालेली सारी दूषणे ही त्यांनी 'भूषणे' म्हणून मिरवली. व्हीलचेअरवरती बसून ते कित्येक वर्षे आंदोलनात आघाडीवर असत. कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येनंतर निघालेल्या अंतिम यात्रेत, वयाची नव्वदी पार केलेल्या एन. डी. पाटील यांना अश्रू अनावर झाले होते. डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर व्यवस्थित चालता येत नसताना देखील दुर्दम्य इच्छाशक्ती असलेले एनडी सर वॉकर घेऊन दर महिन्याच्या २० तारखेला कोल्हापुरात 'दाभोलकरांचा खून करणाऱ्यांवर कारवाई करा', या मागणीसाठी 'मॉर्निंग वॉक' आंदोलन करायचे.

दि १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मृत्यूनंतरही त्यांचा पुरोगामी वारसा जपला गेला. कोणतेही कर्मकांड न करता त्यांचा अंत्यविधी करण्यात आला. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांना 'योद्धा विचारवंत' ही उपाधी लावली जाते. भाई एनडी शेतकऱ्यांमधील बुद्धिजीवी होते. ते परिवर्तनवादी, लोकशाही समाजवादासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी चालते बोलते विद्यापीठ होते.

शोषणमुक्त समताधिष्ठित नवमहाराष्ट्राच्या निर्मितीचे त्यांचे ध्येय होते. 'नाही रे' (अभावग्रस्त) वर्गाचा शोषणाच्या विरोधातील लढा त्यांनी पुढे नेला. आजच्या घडीला स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोककल्याण या मूल्यांना धोके निर्माण झाले आहेत. लोकशाही व संविधानासमोर मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. ज्योतिषी, बुवा-बाबा, स्वामी, महाराज यांची धर्मांध शक्ती यांची राजकीय हातमिळवणी करून रूढी, कर्मकांड व अंधश्रद्धेचे प्रस्थ वाढवत असताना अंधश्रद्धा निर्मूलन समितीला एन. डी. पाटील सरांसारख्या बहुआयामी लढवय्या नेतृत्वाची गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे. त्यातील तरतुदी बहुजन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षण संस्थांना अत्यंत मारक आहेत. सध्याच्या काळात एनडी सरांसारख्या तत्त्वनिष्ठ, अभ्यासू व विवेकी नेतृत्वाची गरज आहे. सध्याच्या राजकारणात तत्त्वनिष्ठा शिल्लक राहिलेली नाही. संधिसाधू, फुटीर, सत्तालोभी, भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृत्तींनी सत्ता काबीज केली आहे. नैतिक मूल्यांना सर्वोच्च स्थानी ठेवून प्रसंगी कोणतीही किंमत मोजून संघर्ष उभा करणारा सत्यशोधक महाराष्ट्र आज हरपला आहे. आजच्या राजकीय परिस्थितीत, 'राजकारण हे सामान्यातील सामान्य गरीब माणसाची प्रगती घडवून आणणारे माध्यम आहे,' हा एनडींचा विचार पुढे नेला पाहिजे.

**संदर्भ:**


१. पाटील विजया (संकलक), प्रा. डॉ. एन. डी. पाटील, मुक्ता पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., कोल्हापूर प्रथमावृत्ती जानेवारी २०१४.

२. प्रा. पाटील एन. डी., माझी संघर्ष यात्रा, विजिगीषा प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती डिसेंबर २०२०.

३. प्राचार्य पाटील डॉ. टी. एस. व कुलकर्णी प्रसाद माधव (संपा.), बुलंद कर्मयोगी, एन.डी.पाटील प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती फेब्रुवारी २०२२.

४. प्राचार्य पाटील डॉ.टी.एस. व कुलकर्णी प्रसाद माधव (संपा.) बुलंद कर्मयोगी.

५. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, संपादक शिंदे नितीन, फेब्रुवारी-मार्च २०२२.

६. फोंडे गिरीश, पुरोगामी चळवळीचे विद्यापीठ, दै. लोकसत्ता दि. १८ जाने. २०२२




**(लेखक महा.अंनिस सांगली जिल्ह्याचे प्रधान सचिव आहेत.)**



# स्वामी विवेकानंद : विश्वधर्म संकल्पनेचे अग्रदूत

**जगदीश काबरे,** सांगली
९९२०१९७६८०

स्वामी विवेकानंदांचे नाव आणि ढोबळमानाने त्यांचे चरित्र आपल्याला माहीत असते. पारंपरिक हिंदू संत म्हणून आपल्याला त्यांची ओळख झालेली असते पण त्यांचे हिंदू धर्माबद्दलचे विचार हिंदू कट्टरपंथीयांच्या प्रसार-प्रचाराच्या अगदी उलट होते हे आपल्याला माहीत नसते. स्वामी विवेकानंदांची अर्धवट आणि संदर्भरहित वाक्ये वाचून, ऐकून त्यांचे अन्यधर्मीयांशी जणू शत्रुत्वच होते अशी आपली समजूत झालेली असते. परंतु त्यांनी शिकागो सर्वधर्म परिषदेत केलेल्या भाषणाचा मथितार्थ सर्व धर्मांचे समन्वय करणारा होता याची आपल्याला कल्पना नसते. त्यांनी संन्यास घेतला होता तरीही त्यांनी शेवटपर्यंत त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या निभावल्या हे फारच थोड्यांना माहीत असावे. त्या निभावण्यासाठी त्यांना कोर्टकचेऱ्या कराव्या लागल्या तरी ते मागे हटले नाहीत. विवेकानंदांचे असे अनेक पैलू तसे अज्ञातच राहिले आहेत. कारण हिंदुत्ववाद्यांनी त्यांची फक्त हिंदुत्वाचे प्रणेते म्हणूनच ओळख जगासमोर आणली आणि त्यांचे चरित्र अशा कट्टर स्वभावधर्मांनी भरून टाकले की ते इतर धर्मीयांचे शत्रूच वाटावेत. विवेकानंदांची नसलेली हिंदुत्ववादी प्रतिमा उभी करून तिचा वापर समाजात दुफळी निर्माण करण्यासाठी केला गेला आहे.



खरे पाहता फुले, शाहू, आंबेडकर यांच्यापेक्षा अधिक भेदक अशी हिंदू धर्माची चिरफाड करीत विवेकानंद भारतीयांना जागृत करण्याचा प्रयत्न करीत होते. १७ सप्टेंबर १८८९ रोजी पूज्यपादांना पत्र पाठवून त्यांनी सांगितले, माझी अगदी पूर्ण खात्री झाली आहे, की आपल्या देशातील प्राचीन मतानुसार जातिविभाग हा वंशगत मानलेला आहे आणि स्पार्टा देशातील लोकांनी तिथल्या गुलामांवर व अमेरिकेतील लोकांनी तेथील निग्रोंवर जेवढे अत्याचार केलेत त्यापेक्षा अधिक अत्याचार आपण या देशातील शूद्रांवर केले आहेत, ह्याबाबत काहीही संदेह नाही. आपले न्यायमत सांगते, 'ब्रह्मज्ञ ऋषींची वाणी म्हणजेच वेद. यादृष्टीने आपले ऋषी हे ज्ञानी होत. पण आजचे विज्ञान साध्या साध्या नियमांबाबत त्यांना अज्ञानी ठरवते त्याचे काय? त्यांचा सूर्य सिद्धांत सांगतो-पृथ्वी त्रिकोणी असून, ती वासुकीच्या मस्तकावर आहे. पण आज आपण हे जाणतो की पृथ्वी गोल असून ती सूर्याभोवती फिरतेय. म्हणून त्यांचे ज्ञान नाकारल्याशिवाय अज्ञानातून सुटका होणार नाही.'

सर्वधर्म परिषदेत विवेकानंदांनी हिंदू धर्माचा झेंडा त्रिखंडात फडकावला हे आपल्या मनावर वज्रलेप करण्यात आलंय. सर्वधर्म परिषद ही त्यावेळच्या अमेरिकेतील सर्वात मोठी घटना होती. तीन वर्षे त्याची तयारी सुरू होती. मात्र, हिंदू धर्माने आपला प्रतिनिधी तेथे पाठवलेला नव्हता. परिषद यवनी भाषेत होती आणि वाटेत हिंदू धर्म बुडविणारा समुद्रप्रवास होता! विवेकानंदांनी आमंत्रण नसताना कसेबसे पैसे गोळा करून तेथे जाणे म्हणजे खेडय़ातील जत्रेत कुस्ती खेळणाऱ्या पहिलवानाने कोठेतरी ऑलिम्पिक सामने आहेत, असे ऐकून तेथे कुस्ती खेळायला जाण्यासारखे होते. तिथे पहिल्यांदा गेल्यावर सर्वधर्म परिषदेच्या स्वागत कक्षातून खिल्ली उडवून विवेकानंदांना परत पाठवले गेले. मग त्यांना त्या परिषदेत प्रवेश कसा मिळाला? विवेकानंदांनी हे आमंत्रण कसे मिळवले, हा एक वेगळाच किस्सा आहे. शिकागोच्या सर्वधर्म परिषदेत विवेकानंदांना प्रवेश मिळाला तो शंकराचार्य किंवा कोण्या हिंदुत्ववादी धर्ममार्तंडांनी त्यांना हिंदूंचा प्रतिनिधी असल्याचे प्रमाणपत्र दिल्यामुळे नव्हे, तर अमेरिकन प्राध्यापक राईट यांच्या

शिफारस पत्रामुळे!

ही सर्वधर्म परिषद ११ सप्टेंबर १८९३ रोजी सुरू झाली. ती १७ दिवस चालली. आपणासमोर येते ते ११ सप्टेंबरला उद्घाटनाच्या दिवशी त्यांनी केलेले पाच मिनिटांचे भाषण. तेसुद्धा समोर येते विसकळीत स्वरूपात. मात्र, या १७ दिवसांत विवेकानंद पुन:पुन्हा काय सांगत होते, ते 'बोस्टन इव्हिनिंग ट्रान्स्क्रिप्ट'च्या ३० सप्टेंबरच्या अंकात आहे. ती बातमी त्यांच्या प्रतिनिधीने २३ सप्टेंबरला पाठवली आहे; ती अशी : 'विवेकानंदांची भाषणे आकाशासारखी व्यापक स्वरूपाची आहेत. सर्व धर्मातील सर्वोत्कृष्ट तत्त्वांचा ज्यात समावेश आहे अशा विश्वधर्माची त्यांच्या मनात कल्पना आहे.' २८ सप्टेंबर रोजी समारोपाच्या समारंभात दिलेल्या भाषणात त्यांनी सांगितले, ''सर्व धर्म एक आहेत. अध्यात्म म्हणजे पावित्र्य, चित्तशुद्धी, दया आणि हे सर्व धर्माचे मूलभूत आधार आहेत. माझा विश्वास आहे की सर्व धर्मांच्या ध्वजावर लवकरच लिहिले जाईल-संघर्ष नको, परस्परांना साहाय्य करा, एकमेकांना आत्मसात करा, विनाश करू नका, कलह नको, मैत्री हवी, शांती हवी.''

विवेकानंदांच्या धर्माबद्दलच्या या अशा मांडणीमुळेच हिंदू धर्ममार्तंडांनी विवेकानंदांना पूर्णपणे नाकारले होते. २० जून १८९४ रोजी हरीदास बिहारीलाल देसाई यांना पत्र पाठवून त्यांनी आपली खंत व्यक्त केली आहे. आपल्या पत्रात ते म्हणतात, मी अमेरिकेत येऊन नऊ महिने पूर्ण झाले. मात्र अजूनही मी हिंदूंचा प्रतिनिधी आहे असे अमेरिकन लोकांना स्पष्ट सांगण्याचा शंकराचार्यांनी, हिंदू संघटनांनी वा हिंदू बांधवांनी काहीही प्रयत्न केलेला नाही. उलटपक्षी, हे लोक अमेरिकन लोकांना सांगत आहेत की, 'मी पक्का भोंदू माणूस असून, अमेरिकेत आल्यावर मी संन्याशाची वस्त्रे परिधान केली आहेत.'

विवेकानंदांनी सांगितले, 'या देशाचा अभ्युदय करावयाचा असेल, तर हिंदू-मुस्लिमांमध्ये समन्वय हवा. या देशातील धर्मांतरे ख्रिश्चन आणि मुसलमान यांनी केलेल्या अत्याचारामुळे नव्हे, तर उच्चवर्णीयांनी आपल्याच धर्मबांधवांवर केलेल्या अत्याचारामुळे झालेली आहेत. त्यांचं धर्मांतरही पुन्हा आपापल्या जातीतच झालंय! दलितांबद्दल आपल्या मनात जी कणव आणि सहसंवेदना आहे, तीच आपल्या मनात त्यांच्याबद्दलही (धर्मांतरितांबद्दलही) हवी. १० जून १८९८ रोजी सर्फराज हुसेन यांना विवेकानंदांनी पत्र पाठवून सांगितले, 'आमच्या अद्वैत वेदांतातील सिद्धांत कितीही सूक्ष्म आणि सुंदर असले, तरी प्रत्यक्ष व्यवहारात समतेचा संदेश सर्वप्रथम आणला तो इस्लामनेच. मात्र, जेथे वेदही नाहीत, कुराणही नाही आणि बायबलही नाही, अशा ठिकाणी आपणाला मानवजातीला घेऊन जायचे आहे. मात्र, हे काम आपणाला वेद, कुराण आणि बायबल यांचा आधार घेऊनच करावे लागेल.' २० ऑगस्ट १८९२ रोजी जुनागडच्या नवाबांना पत्र पाठवून ते सांगतात, 'ज्यांच्या पाचशे पिढ्यांनी वेद ही काय चीज आहे हे पाहिलेले नाही, ते पुरोहित आज वेद सांगताहेत. परमेश्वरा, ब्राह्मणांच्या रूपाने आज या देशात हिंडणाऱ्या या राक्षसांपासून या देशाचे रक्षण कर.' २७ एप्रिल १८९६ रोजी आपल्या आलम बझार मठातील शिष्यांना पत्र पाठवून ते सांगतात, 'आपले देव आता जुने झालेत. आता आपणाला नवा देव, नवा वेद आणि नवा धर्म हवा आहे. कारण आपणाला नवा भारत घडवायचा आहे.'

अगदी खणखणीत शब्दांत ३ मार्च १८९४ रोजी सिंगारवेलू मुदलियार यांना पत्र पाठवून त्यांनी सांगितले होते की, 'सामाजिक गोष्टींच्या बाबतीत धर्माने ढवळाढवळ केली, ही धर्माची सर्वात मोठी चूक आहे. सामाजिक नियमांचा कर्ता होण्याचा धर्माला काहीही अधिकार नाही. धर्माचा संबंध केवळ पारलौकिकाशी आहे, त्याने इहलोकातील सामाजिक क्षेत्रात अजिबात ढवळाढवळ करू नये. आत्तापर्यंत जे अनर्थ घडले त्याचे एकमेव कारण धर्माने सामाजिक बाबतीत ढवळाढवळ केली, हे आहे.' धर्माने सामाजिक बाबतीत ढवळाढवळ केल्याने मानवी समाजाचे कसे अपरंपार नुकसान होते, हे त्यांनी उदाहरणे देऊन सांगितले आहे. त्यातील दोन उदाहरणे महत्त्वाची आहेत. संमती वयाच्या कायद्याबद्दल चर्चा सुरू होती त्यावेळी ब्रह्मानंदांना पत्र पाठवून विवेकानंदांनी सांगितले, 'आठ वर्षांच्या मुलीचा तीस वर्षांच्या घोडनवऱ्याशी विवाह होतोय. या विवाहाबद्दल आई-वडिलांना आनंद होतोय. आणि आम्ही याला विरोध केला तर 'तुम्ही आमचा धर्म बुडवत आहात' अशी ओरड केली जाते. अरे, ज्यांना आपल्या मुली वयात येण्यापूर्वी तिला आई झालेली पाहण्याची घाई

झालेली असते आणि त्यासाठी जे शास्त्रीय स्पष्टीकरण देतात, त्यांना कसला आलाय धर्म?' काही जण सांगतात, 'मुस्लीम आक्रमकांपासून मुलींचे रक्षण करायला बालविवाह निर्माण झाले'. त्यावर विवेकानंद म्हणतात, 'अरे, आपण किती खोटे बोलणार आहोत? मी सर्व गुह्यसूत्रे आणि ब्राह्मणग्रंथ अगदी बारकाईने वाचले आहेत. त्या सर्वांचा आदेश मुलगी लहान असताना तिचा विवाह करावा असा आहे. सर्व भाष्यकारांनी त्याची ग्वाही दिलेली आहे. धर्माने सामाजिक बाबतीत ढवळाढवळ करून घालून दिलेल्या घृणास्पद गोष्टी ठामपणे नाकारण्याची वेळ आता आलेली आहे.'

'धर्म, त्याचा उद्देश आणि त्याची कार्यपद्धती' या आपल्या निबंधात त्यांनी सांगितले, एखादी गोष्ट धर्मग्रंथाने सांगितलेली असेल वा फार मोठा धर्मगुरू सांगत असेल; मात्र ती तुमच्या विचारशक्तीला पटत नसेल तर ती ठामपणे नाकारा. कारण परमेश्वराने मानवाला दिलेली सर्वात मोठी देणगी ही विचार करण्याची शक्ती आहे. विचार न करता एखादी गोष्ट तुम्ही आंधळेपणाने स्वीकाराल तेव्हा तुम्ही खरे तर अगदी नकळत पशूच्या पातळीवर पोहोचता.' धर्माने आपल्या मर्यादेत राहावे, हे विवेकानंद संयत शब्दांत आपल्या शिष्यांना पटवून देतात. मद्रासमधील शिष्यांना त्यांनी २४ जानेवारी १८९४ आणि १९ नोव्हेंबर १८९४ या दिवशी पत्रे लिहिलीत. या दोन्ही पत्रांत त्यांनी सांगितले, 'जीवन, विकास व सुख-शांती या सगळ्यासाठी आवश्यक अशी एकच गोष्ट आहे. ती म्हणजे विचार व आचार यांचे स्वातंत्र्य. ते जर नसेल तर राष्ट्र, मानव किंवा मानववंश यांचे पतन अटळ आहे. इतरांचे नुकसान होत नसेल तर आपण काय खावे, कोणते कपडे घालावेत, कोणाशी विवाह करावा, हे ठरवण्याचा अधिकार प्रत्येकाला हवा.' आहार -विहार नि आचार-विचारांच्या स्वातंत्र्याबाबत तर आजच्या असहिष्णू परिस्थितीत त्यांच्याकडून खूप शिकण्यासारखे आहे. ते उत्तम पाकनिपुण होते. ते ज्या आवडीने बिर्याणी बनवायचे तेवढ्याच आवडीने माशाचे कालवणही. ते गरज आणि परिस्थितीनुसार मांसाहारही करीत आणि व्यसन वाटावे इतका चहा देखील पीत.

विवेकानंद स्त्री-पुरुष समानतेचे भोक्ते होते. स्त्रियांना आपल्या धर्माने दुय्यम लेखले आहे, शूद्रापेक्षा कमी लेखले आहे, असा हा धर्म सहिष्णू कसा असेल, असा त्यांना प्रश्न पडतो? 'पक्षी एका पंखाने उडू शकत नाही. ज्या समाजात स्त्रियांना समान हक्क मिळणार नाहीत, तो समाज उभा राहू शकणार नाही', हे सांगणाऱ्या विवेकानंदांनी अमेरिकेत पोहोचल्यावर आपल्या शिष्यांना पत्र पाठवून कळवले, 'अमेरिका प्रगत आहे. कारण तेथील स्त्रिया मुक्त आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या समर्थपणे उभ्या आहेत. त्या साक्षात जगदंबा आहेत. मी जर मरणापूर्वी अशा शंभर स्त्रिया भारतात निर्माण करू शकलो, तर मी सुखाने मरेन.' रजस्वलेने मंदिरात जाऊ नये, असे सांगत आजही धर्ममार्तंड आडवे येत आहेत. विवेकानंद मात्र काळाच्या खूप पुढे गेले आहेत. ते पत्रातून आपल्या शिष्यांना खडसावून विचारतात, 'दक्षिणेश्वराच्या मंदिरात तुम्ही वेश्यांना प्रवेश देत नाही, हा भयावह प्रकार आहे. मग वेश्येकडे जाणाऱ्या पुरुषांचे काय? मंदिर सर्वांसाठी आहे. थकलेल्या भागलेल्या या आपल्या अभागी बहिणींना तर देवाच्या आधाराची अधिक गरज आहे. मंदिर त्यांच्यासाठी मोकळे करा.'

'हा हिंदू धर्म बदलणार नसेल तर त्याच्याशी माझे काही देणेघेणे नाही,' हे विवेकानंदांनी ९ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा मित्र अळसिंगा पेरूमल यांना पाठवलेल्या पत्रात सांगितलंय. ते लिहितात, 'सुशिक्षित हिंदूंमध्येच आढळून येणाऱ्या जात्यंध, धर्मभोळ्या, निर्दय, दांभिक अशा हिंदूंपैकी एक बनून जगावे व मरावे म्हणून मी जन्माला आलेलो नाही.' धर्माची व्याख्या करताना विवेकानंद म्हणतात, 'माणसाला माणूस बनवतो तो धर्म. आपण एक धर्म स्वीकारला तर सारे धर्म स्वीकारावे लागतील आणि आपण एक धर्म नाकारला तर सारे धर्म नाकारावे लागतील. इतर धर्मीयांचा आदर करण्याची शिकवण देणाऱ्या विवेकानंदांचा वापर धार्मिक विद्वेष पसरवण्यासाठी आज हिंदुत्ववाद्यांकडून केला जात आहे. विवेकानंद म्हणतात, 'जो धर्म अथवा ईश्वर विधवांचे अश्रू पुसत नाही किंवा अनाथ बालकांच्या मुखात अन्नाचा घास घालत नाही त्यावर माझा विश्वास नाही.'

विवेकानंदानी १८९० ते ९३ या काळात भारत उभा-आडवा पिंजून काढला. लोकांचे प्रश्न जाणून घेतले. लोकांची हलाखीची परिस्थिती पाहिल्यावर ते

अस्वस्थपणे मित्रांना पत्र लिहून कळवतात, ‘भारताचा उद्धार करण्यासाठी शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करावयास हवा.’ जिथे सामाजिक अत्याचार, विषमता नसेल, जातिव्यवस्था नसेल सर्वधमीय एकोप्याने राहतील, असा समाज निर्माण करण्यासाठी विवेकानंद तरुण-तरुणींना आवाहन करतात. ते म्हणतात, ‘आपण मरणार हे निश्चित आहे. पण आपण चांगल्या उद्दिष्टांसाठी मरुया. आपली सर्व कामे आपण आत्मसमर्पणाच्या भावनेने करूया. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवावयास हवी, माणसे तयार करणे हे कोणत्याही धर्माचे उद्दिष्ट हवे.’ विवेकानंदांना ‘माणूस घडवणारा धर्म’ अभिप्रेत होता. ‘मी जे बोलतो त्यावर तुमच्यापैकी कोणी निव्वळ विश्वास ठेवला तर मला वाईट वाटेल. स्वतः विचार करण्याची शक्ती तुमच्यात मी जागृत करू शकलो, तर मला आनंद होईल. कारण मला स्त्रीपुरुषांशी बोलण्याची इच्छा आहे, मेंढरांशी नव्हे.’ असे परखडपणे सांगणाऱ्या विवेकानंदांचे विचार अभ्यासले तर ते काळाच्या किती पुढे होते, हे लक्षात येते. थोडक्यात, स्वामी विवेकानंदांचे विचार असे होते...

- कर्मकांडात अडकवलेल्या धर्मावर कोरडे ओढणारे...
- स्वतःच्या अंतर्मनात डोकवायला लावणाऱ्या खऱ्या धर्माचा शोध घेणारे...
- दारिद्र्य, निरक्षरता आणि विषमता या प्रश्नांना प्राधान्य देणारे...
- भारताला वैज्ञानिक आणि उद्योजकांची अधिक गरज आहे असे मांडणारे...
- समाजाचे दोष दाखवताना समाज हतोत्साहित होणार नाही याची काळजी घेत समाजाला विजिगीषु बनवू पाहणारे...

असे नेमके आणि स्पष्ट विचार मांडणारे होते विवेकानंद! मात्र, संघ परिवार त्यांचे आणि आमचे विचार, तत्त्वज्ञान आणि रचना एकच आहे, असे सांगत त्यांचा जयजयकार करत पुढे येतो तेव्हा या परिवाराचा दांभिकपणा उघड होतो. कारण विवेकानंदांचे पुरोगामी विचार दडपून त्यांच्या नावावर आपले जातीय आणि परधर्मद्वेषी विचार लोकांच्या गळी मारण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चाललेला असतो. तेव्हा सजग विचारी माणसांनी हे कायम लक्षात ठेवले पाहिजे की, विवेकानंद हे धर्मभोळे नव्हते... धर्मांध तर नव्हतेच नव्हते; उलटपक्षी धर्मसुधारक होते, म्हणूनच ते समाजवादी होते.

१२ जानेवारी हा स्वामी विवेकानंदांचा जन्मदिन ‘युवा दिन’ म्हणून साजरा केला जातो. म्हणून युवकांनीच स्वामी विवेकानंदांचे विचार मुळातूनच जाणून घेऊन त्यानुसार कृतिकार्यक्रम राबविला तर या देशाचा उद्धार होण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भ :**


१) मूळ बंगाली लेखक शंकर लिखित ‘अज्ञात विवेकानंद’,

२) डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर लिखित ’शोध विवेकानंदांचा’.


**(लेखक पुरोगामी विचारवंत आणि स्तंभलेखक आहेत)**

●

**अ भि वा द न**





**महा.अंनिसचे जिल्हाध्यक्ष, लातूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व ज्येष्ठ समाजवादी नेते ॲड. मनोहरराव गोमारे (वय ८५ वर्षे) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना भावपूर्ण आदरांजली.**

**अ भि वा द न**





**लातूर जिल्ह्यातील सामाजिक चळवळीचे ज्येष्ठ मार्गदर्शक तथाः स्वातंत्र्य सेनानी कॉ.मुर्गाप्पा काशिनाथअप्पा खुमसे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना भावपूर्ण आदरांजली.**



# सावित्रीबाई : आद्य शिक्षिका

**सुशीला म्हात्रे,** नाशिक

ब्रिटीशांचा भारतावर अंमल सुरु होण्यापूर्वीच पाश्चात्य देशांमध्ये अनेक विद्यापीठे स्थापन होऊन त्यात विविध कला, विज्ञान आणि वैद्यक, स्थापत्य अशा आधुनिक विज्ञानाच्या सार्वत्रिक शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरु झाले होते. भारतातील सार्वत्रिक शिक्षणासाठी थॉमस बॅबिंग्टन मेकॉले यांनी जो अहवाल तयार केला होता त्याची अंमलबजावणी गव्हर्नर जनरल लॉर्ड बेन्टिक यांनी दि. ७ मार्च १८३५ रोजी काढलेल्या आदेशाने सुरु झाली आणि समस्त देशवासियांना कधी नव्हे ते शिक्षणाचे द्वार खुले झाले. द्वार तर खुले झाले परंतु आता त्यातून प्रवेशास कोणाकोणाला आणि कशा संधी मिळतील हा सुद्धा पुढचा प्रश्न होताच. वेगवेगळ्या प्रांतातील ब्रिटीश अधिकाऱ्यांनी काही शाळा सुरु केल्या होत्या; परंतु त्यांचे ते प्रयत्न फारच अपुरे होते. त्यातही स्त्रियांना शिक्षण देणे हे धर्मविरोधी कृत्य मानले जात होते.



अशा परिस्थितीत जोतीराव आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी दि. १ जानेवारी १८४८ रोजी देशातील पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाईंनी त्या शाळेत शिकवावे यासाठी जोतीरावांनी आधी सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून तयार केले. कारण मुली पुरुष शिक्षकांकडे शिकतील ही कल्पनाच त्यावेळी शक्य नव्हती. जोतीरावांनी सावित्रीबाईंना मराठी लिहिण्या वाचण्याबरोबरच इंग्रजी आणि संस्कृत भाषा देखील शिकवल्या, मोडी लिपी देखील शिकवली. (सावित्रीबाईंच्या लिखाणाच्या उपलब्ध कागदपत्रांवर त्यांच्या मोडीमधील तसेच इंग्रजीतील सह्या आहेत.)

सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव या गावी झाला. खंडोजी नेवाशे पाटील यांच्या त्या कन्या. तत्कालीन सामाजिक प्रथेनुसार जोतीराव आणि सावित्रीबाई यांचे लग्न बालपणीच झाले होते. मात्र वयात येताच या दाम्पत्याला जशी संसाराची जाण आली तसे सामाजिक भान सुद्धा त्यांना आले.

सावित्रीबाई व जोतीरावांनी मुलींची पहिली शाळा सुरु केल्यानंतर पुढील चार वर्षात त्यांनी एकूण १८ शाळा काढल्या; त्या शाळांमध्ये शिकविण्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षिका तयार केल्या. त्या भारताच्या प्रथम महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका होत्या. या शाळा पुणे शहर परिसरात, पुणे, सातारा आणि अहमदनगर जिल्ह्यातील गावांमध्ये सुरु केल्या. पहिली शाळा भिडे वाड्यात सुरु केल्यानंतर दुसरीच शाळा १५ मे १८४८ रोजी पुण्याच्या महारवाड्यात मुलामुलींसाठी सुरु केली. पुणे जिल्ह्यातील ओतूर येथे चौथी शाळा ५ डिसेंबर १८४८ रोजी सुरु करण्यात आली. १३ वी शाळा १९ मार्च १८५० रोजी अहमदनगर जिल्ह्यातील भिंगार येथे आणि १८ वी शाळा पुण्यातील वेताळपेठेत सुरु केली. त्यासाठी त्याकाळी पुरोहितशाहीकडून मिळणाऱ्या सर्व धमक्या झुगारून दळणवळणाची साधने उपलब्ध नसतांना बैलगाडीने अथवा घोडागाडीने प्रवास करीत नद्यानाले ओलांडून जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी किती कष्ट उपसले असतील याची कल्पनाच केलेली बरी. ओतूर येथील जोतीरावांचे सहकारी भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांनी मोठी मदत केली. ही शाळा आजही चालू आहे.

सावित्रीबाईंचा जन्मदिन हा संपूर्ण महाराष्ट्रात बालिकादिन व महिला मुक्तिदिन म्हणून साजरा केला जातो. सावित्रीबाईंच्या शैक्षणिक कार्यात फातिमा शेख यांचाही मोलाचा वाटा आहे. जोतीरावांचे मित्र उस्मानभाई शेख यांच्या त्या भगिनी होत्या. स्वतःचे घर सोडावे लागल्यानंतर जोतीराव आणि सावित्रीबाई उस्मानभाईंच्या वाड्यात राहत असत. फातिमाबाई सावित्रीबाईंबरोबर शिकू लागल्या व नंतर शिक्षिका झाल्या. मुस्लीम समाजातील त्या पहिल्या शिक्षिका होत. त्यांचा जन्म ९ जानेवारी १८३१ ला झाला.

सावित्रीबाईंच्या कार्याबरोबर फातिमा यांच्या देखील कार्याची आठवण आपण केली पाहिजे. १८५६ मध्ये सावित्रीबाई आजारी पडल्या तेव्हा फातिमाबाईंनी सर्व कामांची जबाबदारी पार पाडली होती.

नोव्हेंबर १८५२ मध्ये ब्रिटिशांनी सावित्रीबाईंच्या कामाची दखल घेतली आणि या कार्यासाठी त्यांचा सत्कार केला. सत्कारप्रसंगी मेजर कॅन्डी सावित्रीबाईंना उद्देशून म्हणाले, 'मिशनरी पद्धतीने सेवा करणाऱ्या सावित्रीबाईंनी विरोधकांचा छळ सोसला मात्र त्यांच्या कार्याला भारताच्या इतिहासात तोड नाही. सनातन्यांचा प्रखर विरोध पचवत एका बाजूला प्रचंड शैक्षणिक काम तर दुसऱ्या बाजूला सामाजिक काम सावित्रीबाईंनी चालूच ठेवलं आहे.'

हे शैक्षणिक कार्य चालू असतांना पुरोहितशाहीने आणि पुरोहितशाहीला बळी पडलेल्या बहुजनांनी जोतीराव आणि सावित्रीबाईंना अनेकप्रकारे त्रास दिला हे सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळेच जोतीरावांना आपल्या वडिलांचे घर सोडून बाहेर पडावे लागले. परंतु सावित्रीबाईंच्या माहेरच्या नातलगांनी सुद्धा त्यांना त्रास दिला. सावित्रीबाई माहेरी गेल्या असता सावित्रीबाईंचा भाऊ त्यांना समक्ष म्हणाला, ''तू व तुझा नवरा वाळीत असून तुम्ही उभयता महारमांगादी अंत्यजाकरता जी कामे करता, ती पतित असून आपल्या कुलास बट्टा लाविणाऱ्या आहेत. यास्तव सांगतो की, तुम्ही नवरा बायकोने जातीरूढीस अनुसरून व भट सांगेल त्याप्रमाणेच आचरण करावे....'' त्याला सावित्रीबाई म्हणाल्या, ''भट लोक सोवळ्यात असता तुझा विटाळ मानतात. तुला महारच समजतात. ... माझे स्वामी देवमाणूस आहे. त्याची सर या देशी कोणाला येणार नाही. .. माझ्या नवऱ्याचा गुणग्राही इंग्रज सरकारने एक समारंभ घडवून त्यात त्यांच्या कार्याचा गौरव करून, आदरसत्कार घडवून दुर्मती दुर्जनास लाजविले... माझा नवरा तुझ्यासारखा वारकऱ्याप्रमाणे हरीनाम घेत वाऱ्या करीत नसून प्रत्यक्ष हरीचे काम करीत आहे. त्यास मी मदत करते. .. त्यायोगे मला परमानंद होतोच होतो.'' माहेरचा हा वृत्तांत दिनांक १० ऑक्टोबर १८५६ च्या पत्राने सावित्रीबाईंनी जोतीरावांना कळविला आहे. त्याच पत्रात त्या पुढे म्हणतात, ''..भाऊ पश्चात्ताप पाऊन याचना करता झाला. .. पुण्यात आपल्या-विषयी दुष्टावा माजविणारे विदुषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही (नायगावला) आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे? सर्वदा कामात गुंतावे. भविष्यात यश आपलेच आहे.''

'भविष्यात यश आपलेच आहे'; आपले कार्य बीजावस्थेत असतांनाच सावित्रीबाईंचा किती हा दांडगा आत्मविश्वास आणि दुर्दम्य आशावाद! धर्म बुडणार.. जग बुडणार.. कली आला अशी हाकाटी देत स्त्री-शिक्षणाला विरोध करणाऱ्या सनातन्यांना न जुमानता सावित्रीबाईंच्या कार्याला आज सुमारे १७५ वर्षानंतर खरोखरच मोठे यश प्राप्त झाले आहे. आजच्या स्त्रियांच्या प्रगतीची चढती कमान नक्कीच आशादायी आहे; मात्र दुसऱ्या बाजूला स्त्री-भृणहत्या, जातपंचायातींकडून स्त्रियांचा होणारा छळ, आंतरजातीय आंतरधर्मीय विवाहास होणारा विरोध, ग्रामीण व काही शहरी भागात होणारे बालविवाह. हे वास्तव हे नाकारता येत नाही.

१ मे १८४९ रोजी उस्मान शेख यांच्या वाड्यात प्रौढांच्या शिक्षणासाठी शाळा स्थापन करून सावित्रीबाईंनी तिथे सुद्धा अध्यापनकार्य केले. शेतकरी आणि मजूर स्त्रीपुरुषांसाठी रात्रशाळा काढली आणि तिथे देखील अध्यापनकार्य केले. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या शिक्षणाव्यतिरिक्त सावित्रीबाई जोतीरावांच्या प्रत्येक कार्यात त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या राहिल्या. ब्राह्मण स्त्रियांना विद्रूप करणारी केशवपन प्रथा मोडण्यासाठी न्हावी व्यावसायिकांचा संप घडवून आणण्याची कल्पना सावित्रीबाईंची होती. हे फार मोठे क्रांतिकारी पाऊल होते. याच ब्राह्मण विधवा जेव्हा लैंगिक अत्याचाराच्या बळी ठरत तेव्हा त्यांना नवजात अर्भकाची हत्या अथवा आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय नसे. अत्याचारातून जन्मलेल्या अर्भकाची अशा एका मातेने हत्या केली त्यासाठी ब्रिटिश सरकारने तिला काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली. या घटनेने सावित्रीबाई अक्षरशः हादरून गेल्या. नदीवर जीव द्यायला गेलेल्या गरोदर विधवेला जोतीरावांनी धीर देऊन वाचवले होते. अशा स्त्रियांचे प्राण वाचविण्यासाठी सावित्रीबाई जोतीरावांच्या बरोबर उभ्या राहिल्या आणि त्यांनी २८ जानेवारी १८५३ रोजी अशा महिलांना निवारा व संरक्षण म्हणून जोतीरावांचे मित्र उस्मान शेख यांच्या घरी 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना केली आणि पाळणाघरही सुरु केले. हे कार्य त्यांनी आरंभले ते काही लपूनछपून नाही, तर चक्क जाहिरात देऊन की, 'येथे येऊन बाळंतपण करून जा'. विधवांच्या पुनर्विवाहासाठी विधवा विवाह सभेची स्थापना सावित्रीबाईंनी केली होती.

१८७६-७७ मध्ये भीषण दुष्काळ पडला. सावित्रीबाईंच्या पुढाकारामुळे जोतीरावांनी ५२ ठिकाणी

अन्नछत्रे सुरु केली, त्यांची देखभाल सावित्रीबाई करीत असत. त्याच दुष्काळात ठिकठिकाणच्या वसतिगृहातील दोन हजार मुलामुलींसाठी जेवणाची सोय केली होती. दुष्काळातही सनातनी प्रवृत्ती कशा वागत होत्या त्याचे मार्मिक वर्णन सावित्रीबाई ओव्यांमध्ये करतात –

दुष्काळ ही पापाची गती।
शूद्रादि अतिशूद्र भोगती।
चमचमीत खाऊन वदती।
पुण्यातले पुण्यवान।

(१) मुलींची शाळा, (२) अस्पृश्य मुलांची शाळा, (३) बालसंगोपन केंद्र (पाळणाघर), (४) बालहत्या प्रतिबंधक केंद्र, (५) हळदीकुंकू समारंभ मंडळ, (६) विधवा विवाह महिला संघ, (७) सत्यशोधक समाज, (८) शेतकरी संघटना (९) दुष्काळ निवारण सभा, (१०) प्लेग निवारण महिला कमिटी; अशी अनेक समाजकार्ये जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी सुरु केली होती. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाचे आधीपासून करीत असलेले कार्य तसेच जोमाने चालू ठेवले. सत्यशोधक समाजाच्या १८९३ साली झालेल्या सासवड येथील २० व्या परिषदेच्या त्या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. या सर्व कार्यात जोतीरावांच्या बरोबरीने सावित्रीबाई उभ्या होत्या आणि त्यातील सर्व भूमिका त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडल्या. त्यामुळे जोतीरावांनी जाहीरपणे मान्य केले की, 'माझ्या हातून जे काही घडले, त्यास माझी पत्नी कारणीभूत आहे.'

सावित्रीबाईंची स्वतःची साहित्य निर्मिती आहे. 'काव्यफुले' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह सन १९५४ मध्ये प्रसिद्ध झाला. जोतीरावांच्या मृत्यूनंतर सन १८९० मध्ये त्यांचे सावित्रीबाईंनी स्वतः लिहिलेले जोतीराव फुले यांचे पहिले काव्यमय चरित्र 'बावन्नकशी' १८९१ मध्ये प्रसिद्ध झाले. जोतीरावांच्या भाषणांचे संकलन स्वतः सावित्रीबाईंनी केले आणि ते २५ डिसेंबर १८५६ रोजी प्रकाशित करण्यात आले.

आज समाजकार्ये करणाऱ्यांना थेट शासकीय अनुदानापासून तर शासकीय योजनांचा निधी, सीएसआर फंड, विविध संस्था आणि व्यक्ती यांच्याकडून मिळणाऱ्या कायदेशीर (ज्यावर करसवलती असतात अशा) देणग्या, परदेशी फंड अशा विविध मार्गाने आर्थिक मदत मिळत असते. आजच्या सामाजिक कार्यकर्त्याला आपल्या खिशातून काही पैसा घालायची गरज नसते. कधी कधी तर लहानशा कार्यासाठी पैशाचा ओघच सुरु होतो. परंतु फुले दाम्पत्याने ज्या काळात समाजकार्य केले तेव्हा कार्यकर्त्याला स्वतःचाच पैसा खर्च करावा लागे. एवढ्या मोठ्या समाजकार्यास फुले दाम्पत्यास इतका पैसा कोठून मिळायचा? भीक मागून? नाही, कदापि नाही.

सावित्रीबाई आणि जोतीराव फुले यांनी जोतीरावांचे पैतृक घर अंगावरील कपड्यानिशी सोडले. त्यानंतर त्यांनी आपला संसार सुरु केला. उपजीविकेसाठी उद्योगधंदे केले. त्याचबरोबर ते लोकप्रिय नेता सुद्धा बनत गेले. एक अव्वल दर्जाचे यशस्वी उद्योगपती आणि व्यापारी सुद्धा झाले. त्यांची 'पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टींग कंपनी' ही बांधकाम क्षेत्रातील एक अग्रगण्य कंपनी होती. त्यांचे काही व्यापार होते. स्वातंत्र्यसैनिक बाळ गंगाधर टिळक हे महात्मा फुल्यांचे टीकाकार तुरुंगात असताना महात्मा फुले यांनीच अगदी खुलेपणाने सहजच दहा हजार रुपयांची रक्कम भरली होती तेव्हा कोठे टिळकांची तुरुंगातून सुटका झाली. यावरून त्यांच्या त्या काळातील श्रीमंतीची आणि उदारतेची कल्पना यावी.

एवढे श्रीमंत फुले दाम्पत्य आपली संपत्ती सढळ हाताने समाजकार्यासाठी खर्च करीत होते. शेवटी कमावलेली त्या काळातील लाखो रुपयांची आपली जवळजवळ सर्वच संपत्ती त्यांनी समाजासाठी खर्च केली. जोतीरावांच्या निधनानंतर सावित्रीबाई आणि त्यांचा मुलगा यशवंत यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट होत गेली. तेव्हा त्या दिवसात मामा परमानंद यांच्या दि. ३१ जुलै १८९० च्या पत्रातील विनंतीवरून सावित्रीबाईंना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दरमहा रुपये ५० अशी मदत केली. या पैशातूनच यशवंतरावांचा एल. सी. पी. एस. हा वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यामुळे फुले दाम्पत्याने भीक मागून समाजसेवा केली हा आरोप केवळ खोडसाळपणा असून त्यांचे जीवनकार्य आणि बहुजनांच्या उद्धारासाठीचे फुले दांपत्याचे योगदान नाकारणे हाच हेतू त्यामागे आहे.

सावित्रीबाईंनी आपल्या लेकींना जे काही दिले ते अनेक पटींनी वाढून तिच्या वारसदार लेकींना पोहोचले आहे. त्यातूनच या वारसदार लेकींनी सावित्रीबाईंचा वारसा चालवावा हीच अपेक्षा; सावित्रीबाईंच्या जन्मदिनी याच सदिच्छा!

**(लेखिका सामाजिक कार्यकर्त्या आहेत)**

●



# सोन्याच्या लोभापायी भोंदूबाबा पोलिसांच्या जाळ्यात

**विष्णुदास लोणारे,** भंडारा
९२२६९०३७३३

नागपूर शहरातील हुडकेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत मानेवाडा येथील ही घटना. येथील चार बहिणींपैकी दोन बहिणी लग्न होऊन बाहेरगावी राहतात आणि कुसुम व सुमन (नावे बदलली आहेत) या दोन बहिणी मानेवाडा येथे राहतात. त्यांचे वडील कोरोनापूर्वी आणि आई कोरोनामध्ये वारली. सर्वात लहान असलेल्या सुमनच्या संसाराची वाताहत झालेली. त्यामुळे ती आईवडिलांच्या मृत्युनंतर माहेरी एकटीच राहत होती. तिला वाटे, 'वडील वारले, लगोलग आई वारली, शिवाय आपल्या संसाराची अशी वाताहत; त्यामुळे आपल्यामागे काहीतरी दैवी पीडा लागलेली असावी.' त्यातच तिच्या या शंकेला शेजाऱ्याने दुजोरा दिला. त्याने अशा पीडेवर उपाय करणाऱ्या एका बाबाचे नाव सुचवले. बाबाला भेटल्यावर त्याने सुमनच्या दैवी पीडेची चिकित्सा केली की, तिच्या आईवडिलांचे आत्मे भटकत आहेत आणि त्यांच्या आत्म्याला शांती लाभल्याशिवाय सुमन आणि तिच्या बहिणींची पीडा दूर होणार नाही. काही विशेष पूजा केल्याशिवाय सुमनच्या आईवडिलांच्या आत्म्यांची शांती होणार नाही याची बाबांनी खात्री करून दिली.

मग सुरु झाले दैवी पीडा दूर करण्याच्या उपायांचे सत्र. बाबाने पूजेचे निमित्त सांगायचे, पूजेसाठी लागणारी कधी रोख रक्कम तर कधी सोन्याचे दागिने सांगायचे आणि सुमनने ती रक्कम, दागिने बाबाला द्यायचे. रक्कम, दागिने मिळाले की बाबा सांगायचा की अमुक दिवसाच्या तिथीला तुमच्या आईवडिलांच्या आत्म्याला शांती लाभावी यासाठी तमुक पूजा केली. मग पुन्हा पुढची पूजा, पुन्हा पुढची आणि आणखी पुढची पूजा व त्यासाठी लागणारी रक्कम उसनवारीने आणून तर कधी दागिनेच सुमन बाबाकडे सोपवायची. एक दिवस असा आला की, सुमनकडील तब्बल ६ लाख ५३ हजार रुपयांची रोख रक्कम आणि ५ लाख ५५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने बाबाच्या हवाली करून झाले होते. प्रत्येक वेळी सुमनला बाबाकडून ताकीद दिली जायची की, या उपायांची वाच्यता कोठेही करायची नाही. नाही तर तिच्या बहिणीचा किंवा बहिणीच्या मुलीचा निश्चित मृत्यू होईल. तरीही बाबाचे तोडगे आणि उपाय मात्र काही संपत नव्हते; आणि सुमनची दैवी पीडा कमी होत नव्हती. अशा स्थितीत आपण मात्र फसवले गेल्याचे सुमनच्या लक्षात आले. तिने बाबाकडे रक्कम परत मागायला सुरुवात केली. तिचा तगादा पाहून बाबाने प्रथम कसेबसे ५० हजार रुपये परतही केले.



परंतु काही दिवसातच बाबाने लोभापायी सुमनला पुन्हा एकदा एकाच वेळी आगामी दैवी संकटाच्या सावटाची भीती आणि त्याचबरोबर आमिषही दाखवले की ५० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि १२ हजार रुपये रोख उद्याच्या तिथीच्या पूजेसाठी तातडीने आण. ही पूजा केली नाही तर तिची बहिण किंवा बहिणीच्या मुलीचा मृत्यू ओढवेल. मात्र पूजा यथासांग झाली तर येणारे दैवी संकट टळेल आणि पहिली रक्कमही दुप्पट होईल. म्हणून सुमनला शेवटचा आशेचा किरण वाटून ती कुसुमकडे रक्कम व दागिने मागायला गेली. कारण सुमन आता पूर्ण कंगाल झाली होती. ५० ग्रॅम सोन्याच्या दागिन्याची गरज तिने कुसुमला सांगितली. परंतु हे दागिने आणि रक्कम नेमकी कशासाठी पाहिजे हे मात्र खोदून विचारल्यावर देखील सुमन बहिणीला सांगायला तयार नव्हती. सुमन कंगाल झालेली आहे ते कुसुमला दिसत होते. सुमन एवढे पैसे कोठे खर्च करते याचा तिने छडा लावायचे आता ठरवले. तिने सुमनचे बँक पासबुक पाहिले. त्यातून

एकाच व्यक्तीला मोठमोठ्या रकमा दिल्याचे तिला आढळले. सुमन काहीतरी तोडगा वगैरे करण्यासाठी कोणाला तरी पैसे देत होती याची कुणकुण तिला आधीच लागली होती आणि त्यातून तिची मोठी फसवणूक झालेली आहे; पण ती कोणालाही सांगू शकत नाही, हे कुसुमच्या लक्षात आले. तिने महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांची मदत घेण्याचे ठरवले.

नागपूरचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांना कुसुम भेटली. प्रकरणातील गुंतागुंत लक्षात घेऊन आळणे यांनी बुवाबाजीविरोधी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांच्याशी चर्चा करून पुढील कारवाई करण्याचे ठरवले. या प्रकरणाचा छडा लावून, बाबाचा भांडाफोड करून सुमनची बाबाच्या जाळ्यातून सुटका करण्याबाबत कुसुमला लोणारे यांनी आश्वस्त केले. कुसुमने प्रथम बहिणीला विश्वासात घेऊन तिला मदत करावी, बाबाचा फोन नंबर घेऊन बाबाशीही बोलून त्याला सुद्धा विश्वासात घ्यावे असे नियोजनानुसार ठरले. मग लोणारे यांनी आपले सहकारी पुरुषोत्तम गायधने, मंजू फोफरे यांच्यासह कुसुमला बरोबर घेऊन नागपूरला राज्यसरचिटणीस संजय शेंडे यांची भेट घेऊन त्यांच्याशी प्रकरणाची सविस्तर चर्चा केली. मग हे सर्व जण हुडकेश्वर पोलीस स्टेशनला गेले. तिथे ठाणे अंमलदार यांना या पूर्ण प्रकरणाची कल्पना दिली. पोलिसांनी या प्रकरणात मदत करण्याचे आश्वासन दिले. परंतु बाबाचे ठिकाण सदर पोलीस स्टेशनच्या हद्दीबाहेर असल्याने सापळा लावण्यात काही अडचणी होत्या. दिलेल्या सल्ल्यानुसार कुसुमने बेन्टेक्सचे दागिने विकत घेतले. सुमनला विश्वासात घेण्यासाठी कुसुमने या दागिन्यांच्या बिलाची पावती सुमनच्या व्हाटस अपवर पाठवून दिली.

मग कुसुम सुमनच्या घराकडे निघाली. कुसुम सुमनला बरोबर घेऊन भोंदूबाबाने सांगितलेल्या ठिकाणी जायला निघाली. त्या दोघींच्या पाठोपाठ आम्ही अंनिसचे कार्यकर्ते आणि दोन पोलीस अंतर ठेवून निघालो. ठरलेल्या ठिकाणी भोंदूबाबा ईश्वर उर्फ इंद्र पप्पू शर्मा आणि त्याचा साथीदार सुनील पप्पू शर्मा हे दोघे आलेले होते. आम्ही अंनिसचे कार्यकर्ते आणि सिव्हील ड्रेसमधील पोलीस कर्मचारी लांब लांब उभे होतो. आम्ही फक्त तक्रारदार कुसुमला आणि तिच्याबरोबर होती म्हणून सुमनला ओळखत होतो. त्यांची त्या दोन्ही भोंदूंच्याबरोबर बराच वेळ रस्त्यावर चर्चा सुरू होती. आम्ही खूप दूर उभे असल्याने त्या भोंदूंना पकडण्याच्या अगोदर ते भोंदू हेच आहेत याची आम्हाला खात्री करून घ्यायची होती. म्हणून ठरलेल्या संकेतानुसार लोणारे यांनी कुसुमला फोन कॉल केला. संकेतानुसारच 'वहिनी बोलते' असा हेच ते भोंदू असल्याचा इशारा कुसुमने दिला. दागिने घेतले का याची सुद्धा खात्री करण्यात आली. त्यांचे भोंदूंशी सर्व बोलणे झाले का याबद्दलही विचारले. त्याचेही उत्तर कुसुमकडून 'होय' असे आले. मग आम्ही अंनिस कार्यकर्ते व पोलीस कर्मचारी या दोन्ही ढोंगी बाबांजवळ पोहोचलो. त्यावेळी सुमनकडून सोने समजून आत्म्याच्या शांतीसाठी आश्वासन देत ५० ग्रॅम बेन्टेक्सचे दागिने एका भोंदूने स्वीकारले होते. बुवाबाजीविरोधी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे, पुरुषोत्तम गायधने आणि पोलीस कर्मचारी यांनी बाबाला चारही बाजूने घेराव टाकला व विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की यांच्याकडे (सुमन आणि कुसुम यांच्याकडे) भूतबाधा झालेली आहे, आत्म्याची शांती करायची आहे त्यासाठी मी त्यांच्याकडून पाच लाख रुपयांचे सोने यापूर्वी घेतले आहे आणि ६ लाख ५३ हजार रुपये रोख घेतले आहेत. आज तीच भूतबाधा उतरवण्यासाठी आणखी ५० ग्रॅम सोने आणि १२ हजार रुपये मागितले आहेत, अशीही कबुली त्याने दिली. भूतबाधा काढता येते का, आत्म्याची शांती करता येते का, तुम्हाला एवढे कळते तर मग आम्ही दिलेले दागिने असली आहेत की नकली आहेत ते तुम्हाला ओळखता कसे येत नाहीत असे आडवेतिडवे प्रश्न विचारू लागल्यावर त्यांची भंबेरी उडाली. त्याच वेळी आमच्या बरोबरच्या पोलिसांनी मुख्य भोंदूला अटक केली. त्यावेळी त्याचा साथीदार पळून जाऊ लागला तेव्हा त्यालाही पकडले आणि दोघांना हुडकेश्वर पोलीस स्टेशन येथे आणले. त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा २०१३ च्या कलम ३ (२), तसेच भा.दं.वि. कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल केला गेला.

ज्यावेळी या भोंदूंची उलट तपासणी केली तेव्हा त्यांनी अशीही कबुली दिली की सुमन आणि कुसुम यांच्या आईला सुद्धा यांनी अशाचप्रकारे मोठ्या रकमेला गंडवले होते. या भोंदूंना अटक होईपर्यंत सुमनला या सापळ्याची काहीही कल्पना देण्यात आली नव्हती. त्यामुळे काय घडते आहे हे तिच्या लक्षातच आले नाही. पोलीस स्टेशनला आल्यावर तिचे समुपदेशन करण्यात आले. ती विज्ञान शाखेची पदवीधर असल्याचे समजले. विज्ञान शिकलेले लोकही अवैज्ञानिक गोष्टींना कसे बळी पडतात हा मोठाच सामाजिक प्रश्न आहे.

**(लेखक महाराष्ट्र अंनिसच्या बुवाबाजी विरोधी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह आहेत.)**

●



# बागेश्वर बाबाची पळवाट अन् सरकारचा वरदहस्त

**विशाल विमल**, पुणे
७२७६५५९३१८

धीरेंद्र रामकृपाल गर्ग हा जेमतेम २७ वर्षे वयाचा तरुण गढा (मध्यप्रदेश, जि. छतरपूर) गावातील आहे. हा तरुण सध्या पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा या नावाने प्रसिद्ध आहे. गढा गावात महादेव व हनुमान यांचे देवस्थान असून त्याचा उल्लेख बागेश्वर धाम सरकार असाही केला जातो. या बागेश्वर धाम सरकारचा हा तरुण-बाबा मठाधीश म्हणून ओळखला जातो. अलीकडच्या दहा वर्षात हा बाबा कथाकार म्हणून उदयास आला. 'सिद्धिप्राप्त' युवा संत अशी त्याने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. श्रीमद्‌भागवत, श्रीराम आणि श्री हनुमान यांच्या पौराणिक कथांचे तो कार्यक्रम करतो. तसेच दरबार भरवून लोकांच्या समस्यांवर इलाज, तोडगे सांगतो. आलिशान गाड्या, उंची कपडे, विविध रंगढंगाचा पेहराव, राजकारण्यांशी सलगी, सोशल मिडियाचा खुबीने वापर, बोलण्यात चलाख व धूर्त अशी या बाबाची वैशिष्ट्ये आहेत.

तर्कविसंगत, अवैज्ञानिक, संविधान मूल्यविरोधी आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे दावे, विधाने, कृत्य, भाष्य हा बाबा सतत कार्यक्रमांतून करत असतो. त्यामुळे त्याला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा आणि पुरोगामी वर्तुळातून विरोध होत राहिला आहे. अपरिचित व्यक्तीच्या भूत, वर्तमान आणि भविष्यातील भल्याबुऱ्या गोष्टी कागदावर लिहिलेल्या खऱ्या ठरतात, असा बाबाकडून आणि त्यांच्या भक्तांकडून दावा केला जातो. 'सनातन' नावाचा धर्म वृद्धिंगत करणे आणि हिंदूराष्ट्र स्थापन करण्याची भाषा हा बाबा सतत करत असतो. लोकांच्या मनात काय सुरू आहे ते ओळखतो. रावणासोबत फोनद्वारे बोलतो. आजार बरे करतो. भूतप्रेते पळवून लावतो. लिंबूद्वारे समाधान प्राप्त करून देतो. ईश्वराचा दूत आहे, आदी दावे बाबा त्याच्या कार्यक्रमातून करतो. अशा काही खटपटी-लटपटीतून लोकांना आकर्षित करण्याचे प्रयत्न करीत असतो. हजारोंची गर्दी आणि हायटेक व्यवस्थेत सतत देशभर त्याचे कार्यक्रम सुरू असतात. बाबाची विचारधारा आणि भारतीय जनता पक्ष व त्यांच्याशी संबंधीत असणाऱ्या संस्था संघटनांच्या विचारधारेत साम्य आहे. त्यामुळे भाजप आणि संबंधीत संस्था संघटनांच्या कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांकडून बाबाचे कार्यक्रम देशभर आयोजित केले जात आहेत. महाराष्ट्रातही नागपूर, मुंबई, छ. संभाजीनगर येथे कार्यक्रम झालेत आणि नोव्हेंबर महिन्यात पुण्यात कार्यक्रम होता.

पुण्यात २०, २१, २२ नोव्हेंबर रोजी बाबाचा 'सत्संग' व दरबाराचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाची आयोजकांच्या सोशल मीडिया आकाउंटवरील जाहिरात १६ नोव्हेंबरला पाहण्यात आली. यासंबंधी आपण काही भूमिका घेणार आहोत काय? अशी विचारणा त्वरित संघटनेच्या राज्य कार्यकारी समिती सदस्यांकडे केली. लगेच राज्य अध्यक्ष अविनाश पाटील यांचा फोन आला. त्यांनी माहिती जाणून घेऊन माझ्याशी सविस्तर चर्चा केली. या प्रकरणासंबंधी दिशादिग्दर्शन केले. त्यानंतर राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांचाही फोन आला. त्यांनी छ. संभाजीनगर येथे बाबा आला होता त्यावेळी संघटनेने केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती दिली आणि पुण्यातील कार्यक्रमाच्या संदर्भात बाबावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करावी असे सुचविले. बाबावर गुन्हा दाखल करावा, बाबाने केलेले चमत्काराचे दावे सिद्ध करावेत, बाबाला प्रशासन यंत्रणेकडून समज दिली यासाठी कसोशीने प्रयत्न करण्याची गरज लक्षात आली. संघटनेचे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष आणि प्रधान सचिवांना याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बाबाचा विषय सांगितला आणि आम्ही कार्यकर्ते कामाला लागलो. एकनाथ पाठक, प्रतीक पाटील, गोविंद पाटील, सम्यक वि म, संजय बारी, स्वप्नील भोसले, विनोद लातूरकर, उत्तम जोगदंड आदी कार्यकर्त्यांनी वेळ, श्रम, बुद्धिमत्ता आणि कौशल्याने कामाचे नियोजन केले. कार्यक्रमाला येणाऱ्या गर्दीतील डोकी आणि सोशल मीडियावरून होणारी पेड ट्रोलिंग

लक्षात घेता, आपण ज्या विषयाला हात घालत आहोत, त्याला अनुचित वळण लागणार नाही, याचा अंदाज घेऊनच बाबावर गुन्हा दाखल करण्याची तयारी सुरू केली. पोलिसांनी मला आणि अविनाश पाटील यांना फोनाफोनी सुरू केली. 'तुमची भूमिका काय? आंदोलन करणार का? भेटायचे आहे', अशा चौकशा सुरू झाल्या. बाबाच्या वादग्रस्त, अशास्त्रीय, असंविधानिक वक्तव्यांचा इतिहास पाहता तत्सम कायद्यांच्या आधारे बाबावर गुन्हा दाखल करण्याच्या तयारीला लागलो. संघटनेच्या कामाच्या दृष्टीने बाबाच्या आक्षेपार्ह गोष्टी शोधून त्याआधारे पोलिसांकडे तक्रार करण्यासाठी अविनाश पाटील यांच्याशी बोलून निवेदन तयार केले. १८ नोव्हेंबर रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल दबडे यांची भेट घेऊन त्यांना बाबावर गुन्हा दाखल करण्यासंबंधी निवेदन दिले. त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी सोबत एकनाथ पाठक, प्रतीक पाटील हे कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी सोबत सम्यक वि म, एकनाथ पाठक, प्रतीक पाटील, स्वप्नील भोसले आणि चारपाच पोलीस उपस्थित होते.

भारतीय राज्यघटनेने व्यक्तीला देव, धर्म, श्रद्धा, उपासना याचे स्वातंत्र्य दिले आहे. त्याचा महा. अंनिस आदर करते. मात्र व्यक्तीची देव, धर्म, श्रद्धा, उपासनेच्या आधारे फसवणूक, दिशाभूल, शोषण होत असेल, त्यातून सार्वजनिक आरोग्य, नीतिमत्ता, कायदा सुव्यवस्थेला अडथळा येत असेल तर त्याविरोधी संघटना भूमिका, प्रबोधन, प्रतिकार व कृतिकार्यक्रम करीत आली आहे. महा. अंनिसचे हे धोरण आणि कृती भारतीय राज्यघटनेशी सुसंगत असून मानवी जीवन समृद्ध करणारे आहे. बाबा जनतेच्या देव, धर्म, श्रद्धा, उपासना याविषयीच्या भावना आणि अगतिकता, अज्ञान यांचा गैरफायदा घेऊन लोकांना देव, धर्म, श्रद्धा उपासनेशी निगडित तर्कविसंगत, अशास्त्रीय, अवैज्ञानिक बाबी सांगत असतो. अशा बाबींनी लोकांना प्रभावित करून अशास्त्रीय मार्गाने जगण्यास प्रवृत्त करत आहे. हे भारतीय संविधानिक मूल्यांशी विसंगत आहे. भारतीय संविधानात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार व अंगीकार करणे हे नागरिकांचे कर्तव्य असल्याचे सांगितले आहे. तसेच देशात केंद्र शासनाचा 'ड्रग्ज अँड मॅजिक रेमिडीज ॲडव्हरटाइजमेन्ट ऑब्जेक्शनेबल ॲक्ट, १९५४' व राज्यात दहा वर्षांपासून जादूटोणाविरोधी कायदा लागू आहे. या कायद्यांचे उल्लंघन बाबाकडून सतत होते आहे. तसेच संत तुकाराम महाराज, त्यांच्या पत्नीबद्दल खोटे आणि बदनामीकारक वक्तव्य या बाबाने केलेले आहे. बाबाची वक्तव्ये, भाष्य, कृत्य पाहता बाबावर शासन व्यवस्थेने जादूटोणाविरोधी कायदा, ड्रग्ज अँड मॅजिक ॲक्ट आणि तत्सम कायद्यांनुसार कारवाई करावी, अशी पहिली मागणी आम्ही पोलिसांकडे केली होती. संतांसंबंधी बाबाचे बदनामीकारक, अब्रुनुकसानकारक वक्तव्य, भाष्य लक्षात घेऊन त्याच्यावर भारतीय दंड संहिता आणि अन्य तत्सम कायद्यानुसार कारवाई करावी, ही दुसरी मागणी होती. बाबा करत असलेले दावे सिद्ध करण्याचे महा. अंनिसचे आव्हान त्याने स्वीकारावे. राज्यात सोयीच्या ठिकाणी नियंत्रित



परिस्थितीत दावे सिद्ध करण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल. बाबाने ते दावे सिद्ध केल्यास त्याला २१ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल, अशी तिसरी मागणी होती. अवैज्ञानिक, अंधश्रद्धेला खतपाणी घालणे, बदनामीकारक वक्तव्य आणि प्रक्षोभक विधाने, सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारी वक्तव्ये बाबाकडून पुन्हा केली जाऊ नयेत यासाठी बाबा आणि कार्यक्रमांच्या संयोजकांना शासन व्यवस्थेने सक्त ताकीद द्यावी, अशी चौथी मागणी होती. पाचवी मागणी होती की, कार्यक्रमाचे व्हिडीओ शूटिंग करण्याची सूचना संयोजकांना शासन व्यवस्थेने द्यावी. प्रचलित कायद्यांशी विसंगत विधाने, भाष्य, वक्तव्ये, इशारे, कृत्य घडल्यास बाबांवर गुन्हे दाखल करून कारवाई करावी. आणि सहावी मागणी होती की, बाबा करत

असलेले दावे अवैज्ञानिक असल्याची उकल करून वैज्ञानिक विचारधारा समाजात रुजवण्यासाठी शासनाने प्रसारमाध्यमे, शिक्षण संस्था आदींमार्फत प्रयत्न करावेत. बाबाच्या दाव्यांविरोधी महा. अंनिस शास्त्रीय माहिती, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्याचे काम करत आहे, त्याला शासन व्यवस्थेने पाठबळ द्यावे.

बाबाच्या भूमिकांना जोरदार विरोध आणि बाबावर गुन्हा दाखल करण्याची महा. अंनिसची मागणी ही प्रसारमाध्यमातून वाऱ्यासारखी पसरली आणि कार्यकर्त्यांसह पोलीस आणि ट्रोल्सचे फोन कॉल, मेसेज सुरू झाले. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि ऑनलाईन या तिन्ही प्रसारमाध्यमांनी महा. अंनिसची भूमिका उचलून धरली. पोलिसांच्या चौकशा, कार्यकर्त्यांकडून व हितचिंतकांकडून काळजी आणि पाठबळाचे फोन, त्याचवेळी ट्रोल्स भक्तांकडून काहीबाही व्यक्त होत होते. सोशल मीडियावरील ट्रोल्सच्या प्रतिक्रिया दुर्लक्षित करायच्या, फोनवर कुणाशी फार बोलायचे नाही, हे ठरविले असल्याने ते मानसिक स्वास्थ्यासाठी उपयोगी ठरले. पण गंमत म्हणजे काळजीवाहू कार्यकर्ते, मित्र-मैत्रिणी, हितचिंतक हे सोशल मीडियावरील शिव्याशापांचे स्क्रीनशॉट काढून मला पाठवत होते. त्यातून भक्तांची पातळी आणि कुवत लक्षात आली.

बाबाने २० नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषद घेऊन महा. अंनिसचे आक्षेप, मागणी, आव्हान याला बगल देऊन पळवाट काढली की, ''माझ्या दरबारामध्ये या, तुमचे काय म्हणणे आहे ते मांडा. आपण दूध का दूध आणि पानी का पानी करू, एकदाच आमने- सामने होऊन जाऊ द्या,'' असे बाबाने महा. अंनिसला प्रतिआव्हान दिले. त्यामुळे पत्रकारांनी देखील फोन करून भूमिका व्यक्त करण्याची आणि आव्हान स्वीकारण्याची मागणी केली. हजारो लोकांसमोर आव्हान प्रक्रिया पार पाडायची तर जनतेत काही प्रमाणात उत्सुकतापूर्ण तणाव निर्माण होणार होता. त्यामुळे अंनिस संबंधीच्या बाबाच्या वक्तव्याने पोलिसांचा ताण वाढल्याने त्यांनी मला फोनाफोनी सुरू केली. खरे तर पोलिसांनी बाबाला समज देणे, त्याच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करणे अपेक्षित असतानाही पोलीस त्याबाबतीत मात्र गप्प होते, तर दुसऱ्या बाजूला संघटनेकडून बाबाचा पर्दाफाश किंवा त्यासारखे काही पाऊल उचलले जाते की काय म्हणून पोलीस अंदाज घेत होते.

## बागेश्वर महाराजांची पळवाट

### महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : अशास्त्रीय, अवैज्ञानिक, घटनात्मक तरतुदीविरोधी भाष्य करत अंधश्रद्धेला खतपाणी घालणारी विधाने करणारे बागेश्वर महाराज ऊर्फ धीरेंद्र शास्त्री हे आव्हान स्वीकारण्याऐवजी पळवाट शोधत असल्याचा आरोप महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सोमवारी केला.

वकील, पोलीस अधिकारी, निवडक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील निवडक तज्ज्ञ मंडळींचे दावे सिद्ध केल्यास बागेश्वर महाराजांना २१ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल, असे आव्हान अंनिसने वेळोवेळी दिले आहे. मात्र, आव्हान लेखी स्वरूपात स्वीकारत नसल्याचे अंनिसचे कार्यकर्ते विशाल विमल यांनी सांगितले. आक्षेप, खुलासे, दाव्यांची सिद्धता ही दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी शांततेत कशी होऊ शकते, असा प्रश्न उपस्थित करून विमल म्हणाले, की दरबारात आमने-सामने आल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी आमने-सामने यावे, असे म्हणणे ही महाराजांनी काढलेली पळवाट आहे. संघटनेच्या वतीने लवकरच त्यांच्याशी पत्रव्यवहार केला जाणार आहे. राज्यात सोईच्या ठिकाणी नियंत्रित परिस्थितीत दावे सिद्ध करण्याची प्रक्रिया पार पाडण्यासाठी अंनिस तयार आहे.

बाबाने आव्हान दिल्यानंतर संघटनेच्या वतीने भूमिका न मांडणे हे बाबाच्या हिताचे ठरले असते. संघटनेने माघार घेतली असा समज निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सिद्धता चाचणी दरबारात घेण्याची बाबाची मागणी ही अव्यवहार्य आहे आणि बाबा ही पळवाट काढत असल्याची भूमिका संघटनेच्यावतीने मांडल्यावर त्याला प्रसारमाध्यमांनी जोरदार प्रसिद्धी दिली. त्यावर मात्र बाबा गप्प बसला. सोशल मीडियावर बाबाचे जे भक्त हिंसक प्रतिक्रिया देतात, स्वतः बाबा देखील चिथावणीखोर आणि भडकावू वक्तव्य करतो त्यामुळे आक्षेप, खुलासे, दाव्यांची सिद्धता ही दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी शांततेत कशी होऊ शकेल, हा प्रश्न होताच. पण या सिद्धता चाचणीसाठी पोलीस प्रशासन देखील पुढाकार घेत नव्हते. उलट दरबारात आमने सामने आल्यास कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वस्तुस्थिती पाहता बाबाच्या दरबारात अथवा सत्संगाच्या ठिकाणी कायदा सुव्यवस्था पाळण्याची जबाबदारी असणारी शासन यंत्रणा, पोलीस यंत्रणा आणि खुद्द बाबा देखील आमने सामने वक्तव्य आणि दाव्यांची सिद्धता चाचणी पार पाडू शकत नव्हते. त्यामुळे दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी आमने सामने यावे असे म्हणणे ही बाबाने काढलेली पळवाट होती.

बाबाचा तीन दिवसीय सत्संग आणि दरबार कार्यक्रम २२ नोव्हेंबर २०२३ रोजी संपला. अशास्त्रीय, अवैज्ञानिक,

घटनाबाह्य, दिशाभूल व फसवणूक करणारे आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे वक्तव्य, भाष्य, कृत्य यांची पुनरावृत्ती पुण्यात देखील झाली. कार्यक्रमाच्या ठिकाणी भक्त आणि संयोजकांमध्ये हाणामारी झाली. शहरात पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला. वर्दीत असणारे पोलीस अधिकारी हे बाबाच्या दरबारात जाऊन बाबापुढे नतमस्तक झाले. पोलिसांनी अशास्त्रीय पद्धतीने समस्यांची उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न केला असून त्यांचे दरबारात जाणे हे महाराष्ट्र सेवा अधिनियम व तत्सम कायद्यांचा भंग करणारे आहे. त्यामुळे पोलिसांवर गुन्हा दाखल करून कारवाई होणे अपेक्षित आहे. महा. अंनिसने आजवर विविध धर्मीय बुवाबाबा आणि अम्मा मातांच्या अशास्त्रीय दाव्यांचा पर्दापाश केला आहे. अनेक बाबांना आव्हाने देऊन त्यांची सिद्धता चाचणी घेऊन त्यांचे दावे खोटे असल्याचे सिद्ध केले आहे. त्यांच्या अवैज्ञानिक व फसव्या दाव्यांना चाप लावला गेला आहे.

संघटनेने ह्या बाबाला देखील चमत्काराचे दावे सिद्ध करण्याच्या चाचणीसंबंधी पत्रव्यवहार केला आहे. त्यामुळे बाबाने ते आव्हान स्वीकारून, तसे लेखी द्यावे. शासन व्यवस्थेने या प्रकरणाकडे केवळ बघ्याच्या भूमिकेतून न पाहता, पुढाकार घेऊन नियंत्रित परिस्थितीत दाव्यांची सिद्धता चाचणी आयोजनामध्ये आपली भूमिका बजावणे गरजेचे आहे. बाबाने सोयीच्या ठिकाणी, नियंत्रित परिस्थितीत आणि वकील, पोलीस अधिकारी, निवडक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील निवडक तज्ज्ञ मंडळींच्या कमिटीसमोर दावे, कृती सिद्ध करावेत. बाबासंबंधीच्या आक्षेपार्ह बाबींसंबंधी गुन्हे दाखल करून कारवाईची मागणी संघटनेच्या वतीने पोलीस यंत्रणेकडे कार्यक्रमपूर्व केली होती. पण हा कार्यक्रमच सत्ताधारी पक्षाचे माजी आमदार, माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी आयोजित केलेला होता. त्याला त्या पक्षाचे नेते, खुद्द उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस आणि पोलीस अधिकारी हे उपस्थित राहून बाबाच्या चरणी लीन होत असले तरी पोलीस प्रशासनाने प्रचलित कायद्याची निःपक्षपातीपणे अंमलबजावणी करावी. राज्याचा गृह विभाग अशास्त्रीय, अवैज्ञानिक, घटनाबाह्य वक्तव्य, भाष्य, कृत्य करणाऱ्याला, दिशाभूल व फसवणूक करणाऱ्याला, अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्याला बळ, पाठींबा देत आहेत. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री आणि पोलीस प्रशासनाचे हे वर्तन संविधान विरोधी आहे. त्यामुळे त्यांच्या कोणत्याही दबावाला बळी न पडता कायद्याचे प्रहरी म्हणून पोलीस प्रशासनाने सुओमोटो कारवाई करावी अशी संघटनेची भूमिका आहे.

**(लेखक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत.**

•


# सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर

**संचालित**

१) सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
२) शंकरराव बेझलवार कला, वाणिज्य महाविद्यालय, अहेरी, जि. गडचिरोली
३) शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
४) सौ. सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालय, पडोली
५) सौ. लिना किशोर मामीडवार इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, कोसारा, चंद्रपूर
६) नेहरू विद्यालय, चंद्रपूर
७) इंदिरा विद्यालय, वरूर रोड
८) श्री. साईनाथ विद्यालय कढोली
९) गुरूनानक विद्यालय, विरूर (स्टे)
१०) आदर्श किसान विद्यालय, नारंडा
११) सरस्वती विद्यालय, वढोली



**श्रीमती सुधाताई पोटदुखे**
अध्यक्ष, सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर



# ज्येष्ठ साथींच्या प्रेरणेने, नव्या साथींना जोडत...

**पुरुषोत्तम बी. ठाकरे,** गडचिरोली
९४२१८५६७६३

माझे बालपण एका साधारण खेडेगावात गेल्याने खेड्यात घडत असलेल्या चांगल्या वाईट घटनांचा मी साक्षीदार आहे. त्यावेळी अंधश्रद्धांना खतपाणी घालणाऱ्या अनेक घटना नेहमी आमच्या व आजुबाजूच्या गावांत घडत असायच्या. काही अशिक्षित लोक आरोग्याच्या तक्रारी घेऊन डॉक्टरकडे जाण्याऐवजी गांवातील मांत्रिकांकडे अधिक प्रमाणात जात असत. आमच्या कुटुंबातील आम्ही तीन भावंडे सोडल्यास आई-वडील आजोबा सर्वच अशिक्षित होते. मी साधारणत: ८ वी मध्ये शिकत असतांना मला अनेक दिवसांपासून पोटदुखीचा त्रास होता. अनेक डॉक्टर झाले पण गुण काही येत नव्हता. अशातच माझ्या आई-वडिलांनी आजोबांसोबत मला एका जवळच्याच गावातील वैदूकडे पाठविले. तो दुखत असलेल्या ठिकाणी पोटावर लोखंडी सळईने डागण्या देऊन इलाज करीत असे. पंचक्रोशीत त्याची तशी ख्याती देखील होती. मलाही गरम सळईने पोटावर चटके देण्यात आले. परंतु यानंतरही माझे पोटाचे दुखणे कमी झाले नाही. शेवटी मला पुन्हा माझ्या आईवडिलांनी दुसऱ्या डॉक्टरकडे नेले. काळाच्या ओघात मी आजारातून जरी बरा झालो असलो, पोटावरील व्रण नाहीसे झाले तरी त्या डागण्यांमुळे मला झालेल्या असह्य  वेदना मी आजही विसरु शकलेलो नाही. गावात भुताटकीचेही प्रकार, अंगात येणे, अमावास्या पोर्णिमेला हळद, कुंकू, गुलाल, बुक्का व लिंबू मिरची इ. मुख्य चौकात टाकणे असे प्रकार अंधश्रद्धेपोटी वर्षानुवर्षे पुढेही घडतच राहिले. त्यांचा उलगडा करण्याचे माझे वय नव्हते. वयोपरत्वे व शिक्षण घेत गेलो तशी हळुहळू त्या गोष्टींची निरर्थकता लक्षात येत गेली. अशा गोष्टी समाजातून हद्दपार व्हाव्यात यासाठी काहीतरी करावे असे मला मनोमन वाटायचे.

मी गडचिरोली येथे सहाय्यक शिक्षक म्हणून राणी दुर्गावती कन्या विद्यालयात रुजू झालो. १९९० ते ९१ या काळात त्याच शाळेतील गणित व विज्ञान विषयाचे शिक्षक विलास निंबोरकर, जे आज वैज्ञानिक जाणीवा शिक्षण प्रकल्प राज्य सहकार्यवाह पदावर कार्यरत आहेत, त्यांच्या संपर्कात आलो. ते गडचिरोली येथील श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे मा. डॉ. शिवनाथजी कुंभारे व आमच्या शाळेचे संस्थापक अध्यक्ष स्व. दलित मित्र लहुजी मडावी यांच्यासोबत श्रीगुरुदेव सेवा मंडळ व्यसनमुक्ती कार्यक्रम व सर्वोदय मंडळाद्वारे गांधी विचारांचा प्रसार व प्रचार यासारखी सामाजिक कार्ये करीत होते. यानिमित्ताने त्यांना भेटायला काही बाहेरील मंडळी शाळेत येत असत. यात विशेषत: वर्ध्याहून येणारे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काही सामाजिक कार्यकर्ते व सर्वोदय मंडळातील काही बाहेरची मंडळी असत. आज राज्य समितीमध्ये प्रधान सचिव असलेले व पूर्णपणे अंनिस कार्याला समर्पित असलेले मा. गजेंद्र सुरकार तसेच शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर हे देखील त्यांच्याकडे येऊन गेलेले होते. त्यांच्यात वरील सामाजिक विषयांच्या संबंधाने काही चर्चा देखील




घडत असत. त्याचवेळी महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा अध्यक्ष उद्धव डांगे यांचे सोबतीने त्यांनी गडचिरोलीत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम जिल्ह्यात नव्याने सुरू केले होते. याचदरम्यान अखिल भारतीय अंनिसचे श्याम मानव यांच्या गांधी चौकातील राजीव भवन येथे झालेल्या सभेला मी उपस्थित होतो. अंधश्रद्धांचे निर्मूलन होणे खरोखर गरजेचे आहे हे मनोमन मला पटत होते. पण हे वाटते तितके सोपे नाही याची जाणीवही मला होत होती. कारण बहुजनांची मानसिकता 'कळते पण वळत नाही' अशी असल्याने अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम आपण कितपत करु शकू याबद्दल मी साशंक होतो. परंतु नोकरीने आर्थिक व कौटुंबिक समस्या बऱ्यापैकी मिटल्याने मी अंनिसच्या कार्यात स्वत:ला झोकून देण्याचे ठरविले.

निंबोरकर सरांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम व त्या

अनुषंगाने त्यांची सतत चाललेली धडपड हे मी प्रत्यक्षात जवळून पाहत होतो. नंतर उद्धव डांगे यांची नोकरीच्या निमित्ताने चंद्रपूर जिल्ह्यात बदली झाली. निंबोरकर सर हे जसे शक्य होईल तसे अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम एकट्याने लढवित होते. त्यांची अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याप्रिति असलेली बांधिलकी, समर्पित वृत्ती, जिद्द व सामाजिक बदलाची धडपड बघून मी खूप प्रभावित झालो. त्यांना प्रभावित करणाऱ्या डॉक्टर नरेंद्र दाभोलकरांचे व्यक्तिमत्त्व किती प्रभावी असेल याचा मी विचार करायचो. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे मी स्वतःला अंनिसशी जोडून घेण्याचा एकदाचा निर्णय घेतला. त्यानंतर गडचिरोली शाखेतील एक क्रियाशील कार्यकर्ता म्हणून मी येतील ती कामे करीत राहिलो. बैठकांना उपस्थित राहून सर्व उपक्रम आणि कार्यक्रमांना हजर राहून पडतील कामे करीत होतो. त्यातून संघटनेच्या कार्याचा आणि एकूण कार्यपद्धतीचा परिचय झाला.

दरवर्षी शालेय शिक्षण विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या तालुका व जिल्हा विज्ञान प्रदर्शनीमध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यक्रम निंबोरकर सरांच्या सोबतीने मी करीत होतो. हळुहळू मी चमत्कारांची प्रात्यक्षिके आत्मसात करुन त्यांचे सादरीकरण सुरु केले. प्रात्यक्षिके करतांना निंबोरकर सरांचे मार्गदर्शन व स्वत:ची काही वेगळी पद्धती वापरुन मी एकंदरीत चांगल्याप्रकारे प्रेक्षक खिळून राहतील अशा प्रकारे सादरीकरण करु लागलो. निंबोरकर सर व डांगे सर माझ्या कार्याची सतत प्रशंसा करीत असत त्यामुळे मलाही या क्षेत्रात अधिकच प्रोत्साहन व रुची निर्माण होत गेली. पोलीस विभागातर्फे आयोजित जनजागरण मोहीम असो, समाजकार्य महाविद्यालयातर्फे आयोजित अंनिसचे कार्यक्रम असोत की विविध महाविद्यालयांद्वारा आयोजित एन एस एस ची शिबीरे असोत यात मी आणि निंबोरकर आम्ही दोघेही ऊन, वारा, थंडी, पाऊसपाणी यांची तमा न बाळगता बाहेरगांवी कार्यक्रम आटोपून रात्री-बेरात्री टू व्हीलरने घरी परतायचो. प्रत्येक शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी आमचा कुठे ना कुठे कार्यक्रम नियोजित असायचाच. हे सर्व करीत असतांना आमच्या नोकरीतील नियमित कर्तव्याकडे मात्र कधीही दुर्लक्ष केले नाही. गणित व इंग्रजी या विषयाचे अध्यापन करतांना कोणतीही कसर न ठेवता शाळेची व विद्यार्थ्यांची गुणवत्ता कायम ठेवली.

दि. २० ऑगस्ट २०१३ ला डॉक्टरांचा पुण्यात खून करण्यात आला. ही घटना माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर एक प्रकारचा वज्राघात होता. यापुढे अंनिसचे काय होईल! हा प्रश्न नेहमीच वारंवार माझ्या मनात येत होता. तशातच डांगे सरांची चंद्रपूरला बदली झाली. त्यानंतर त्यांच्याच निवासस्थानी पार पडलेल्या अंनिसच्या जिल्हा कार्यकारिणी निवड बैठकीत डांगे सर व निंबोरकर सर यांनी जिल्ह्याचे प्रधान सचिव पद स्वीकारण्यासाठी माझी शिफारस केली. कोणत्याही प्रकारची कल्पना नसताना असं एकाएकी पद स्वीकारणे म्हणजे माझ्यासाठी तरी खूप आश्चर्यजनक होते. निंबोरकर यांनी मला प्रोत्साहन देऊन सांगितले की तुम्हाला सदर कार्य करताना कुठल्याही प्रकारची अडचण जाणवणार नाही. सोबत असल्याच्या त्यांच्या आश्वासनाने मी ही जबाबदारी २०१४ ला स्वीकारली.

डॉक्टरांच्या हत्येनंतर २०१४ ला अकोला येथे महाराष्ट्र अंनिसची राज्यकार्यकारिणी बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्या बैठकीस जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधान सचिव निमंत्रित होते. परंतु सदर बैठकीला कार्याध्यक्ष म्हणून निंबोरकर सर काही अपरिहार्य कारणाने येऊ शकणार नव्हते त्यामुळे जिल्हा प्रधान सचिव पदाधिकारी म्हणून मी एकटाच गेलो. एवढ्या लांब मी एकटाच अशाप्रकारच्या बैठकीला कधी आजवर गेलेलो नव्हतो. निंबोरकर सरांबरोबर अनेक कार्यक्रम केलेलेच होते. त्यांनी बैठकीत सादर करायच्या माहितीची तयारी करून दिली होती. त्यामुळे बैठकीचे नेमके स्वरुप कसे असते याची मला कोणतीच कल्पना नसतांनाही मी आत्मविश्वासाने जिल्हा शाखेचा अहवाल सादर केला. त्यांची पद्धतशीर मांडणी केली. अहवाल वाचून झाल्यावर सदर अहवालाची एक प्रत त्यावेळचे राज्य प्रधान सचिव माधव बावगे सरांकडे दिली. त्यांनी व दुसऱ्या राज्य प्रधान सचिव मा. सुशीलाताई मुंडे यांनी तो अहवाल व त्यातल्या नोंदी बघून माझे कौतुक केले व पाठीवर शाबासकीची थाप दिली.

अकोला येथील राज्यस्तरीय बैठकीत खूप काही शिकायला मिळाले. बैठकीचे कामकाज कसे चालते, केलेल्या कामाचे डॉक्युमेंटेशन कसे करावे, संघटना बांधणी कशी करावी, कोणते उपक्रम करावेत व कार्यकर्ता प्रशिक्षण इ. बाबत खूप काही शिकायला मिळाले. अकोला येथील बैठक माझ्यासाठी एक प्रकारचे ऊर्जा प्रदान करणारे प्रशिक्षणच होते. तिथे मिळालेली प्रेरणा व ऊर्जा घेऊन गडचिरोलीत परत आल्यानंतर मी नव्या दमाने कामाला लागलो. जिल्ह्यात शाखांची माहिती गोळा करणे, शाखांचे रजिस्ट्रेशन, त्यांचे डॉक्यूमेंटेशन करणे, नवीन शाखांची निर्मिती, कार्यकर्ते प्रशिक्षण, निर्भय मॉर्निंग वॉकचे आयोजन, कार्यकर्ता प्रशिक्षण, जिल्ह्यातील शाखा भेटीचा कार्यक्रम

आखून शाखांना भेटी देणे, कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या अडचणीबाबत चर्चा करणे, चमत्कार प्रशिक्षण व सादरीकरण इ. कामे मी झपाटल्याप्रमाणे करीत होतो. पण केलेल्या कामाची माहिती लोकांपर्यंत जात नव्हती व ती पोहोचणे मात्र गरजेचे वाटत होते. यासाठी मग सोशल मिडियाचा पुरेपूर वापर करण्यावर सुरुवातीस भर दिला. मोबाईलचा पुरेपुर वापर करुन व्हॉट्स ॲप गृप तयार करुन नेहमी त्यांच्या संपर्कात राहून संवाद करीत असायचो. या नियोजनाचे चांगले परिणाम हळुहळू दिसून आले. जिल्ह्यात केलेल्या उपक्रमांची माहिती राज्य स्तरावर देखील पोहचू लागली. आज महाराष्ट्र अंनिसचे काम बऱ्यापैकी पुढे गेलेले असून संपूर्ण महाराष्ट्रात गडचिरोली शाखेचे नांव घेतले जाते. याचे खरे श्रेय निंबोरकर सर व माझ्या सोबत वेळ देत तनमनधनाने कार्य करीत असलेले सर्व विश्वासू साथी यांना जाते. संघटनात्मक दृष्टीने काहीतरी नावीन्यपूर्ण गोष्टी आम्ही सतत करीत राहतो.

जिल्ह्याचे प्रधान सचिव पद आल्यानंतर मी वरीलप्रमाणे कामे करीत अधिकच सक्रिय झालो. तेव्हापासून तर आत्तापर्यंत जिल्ह्याचा प्रधान सचिव म्हणून दोन टर्म पूर्ण केल्या व सध्याचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे सरांच्या आग्रहाने पुन्हा तिसऱ्यांदा जिल्ह्याचे प्रधान सचिव पद मी सांभाळत आहे. या आधी मी जिल्ह्याचा सांस्कृतिक विभाग देखील सांभाळला. माझ्याकडे सांस्कृतिक विभाग असतांना जिल्हास्तरावर अंनिस कार्यकर्त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा भव्य कौटुंबिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

मागील काही वर्षांत अंनिसच्या उपक्रमांच्या जोडीला वैशिष्ट्यपूर्ण अशी काही कामे आम्ही अंनिसच्या वतीनेच जिल्ह्यात राबविलेली आहेत. भामरागड येथील पूरग्रस्तांना किराणा साहित्य व कपड्यांचे वाटप, आदिवासी पाड्यांवर जाऊन दिवाळीच्या निमित्ताने फराळ वाटप करत आदिवासी बांधवांसोबत दिवाळी सण साजरा करणे, गडचिरोली कारागृहातील कैद्यांसाठी स्वरांगणच्या माध्यमातून संगीत मैफलीचे आयोजन व रक्षाबंधन, वृद्धाश्रमात वृद्धांसोबत होळीचा सण साजरा करणे, यासारख्या उपक्रमांनी वंचित घटकांच्या जीवनात क्षणभर का होईना आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो.

सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या, वेळप्रसंगी आर्थिक खर्च करून संघटनेच्या कामाला गती देणाऱ्या अशा काही माणसांचा शोध आम्ही सातत्याने घेत राहिलो; त्यांना जमतील त्या जबाबदाऱ्या आम्ही देत गेलो. हळूहळू त्यांच्यात आत्मविश्वास व सामाजहिताची जाणीव निर्माण झाली. यातूनच अलिकडे सर्वश्री दामोदरजी उप्परवार, प्रा. विलास पारखी, पुरुषोत्तम चौधरी, जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलरावजी कोठारे, सुधाकर दुधबावरे, एस बी शेख, वामनजी भोयर, प्रशांत नैताम, उद्धव बांगरे, प्राचार्य सी एल डोंगरवार, शिवराम मोगरकर, प्रा. चोखारामजी कांबळे, आसीफ सैय्यद, दादाजी बोरकर, गणपती चौधरी, मोतिरामजी नहामुर्ते, यांच्यासारखी मंडळीं संघटनेशी जोडली गेली आहेत. यांच्या आणि अशा अनेक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने आज अंनिसचे काम गडचिरोली जिल्ह्यात चौदा शाखांच्या मदतीने सुरु आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा यासाठी देखील सतत प्रयत्न करुनही पाहिजे तसे यश आम्हाला आलेले नाही. परंतु आज ज्या काही महिला कार्यकर्त्या आमच्या सोबत अंनिसमध्ये सक्रिय आहेत त्यात अर्चना राऊत, संध्या येलेकर, वर्षा राजगडे, सुधा चौधरी, अल्का गुरनुले, रजिया उसेंडी, अंजुम शेख, व शितल मानकर यांचेही मोलाचे योगदान आहे.

महाराष्ट्र अंनिसमध्ये मी गेली १० वर्ष सक्रियपणे कार्य करीत असून केवळ जिल्ह्यातच नव्हे तर जिल्ह्याच्या बाहेर देखील गडचिरोली जिल्ह्यातील अंनिस कार्यकर्त्यांची एक वेगळी ओळख आहे. अंनिसच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यामुळे आज इतर अनेक संस्थाकडून आमच्या कामाला प्रचंड मागणी आहे. या कार्यामुळे सामाजिक कार्यकर्ता म्हणून मान-सन्मान प्रतिष्ठा आपोआप मिळत गेली; याचा प्रत्यय मला अनेकदा आला. त्यामुळे जीवनाच्या अखेरपर्यंत मी एक अंनिसचा कार्यकर्ता म्हणूनच कार्य करत राहीन व हीच माझी शहीद डॉ. दाभोलकरांना विनम्र आदरांजली असेल.

**(लेखक महा.अंनिस गडचिरोली जिल्ह्याचे प्रधान सचिव आहेत)**

•


# M/s. P. R. KARVE

**Proprietor : Anil Agashe**

**Dealers**

**JOTUN, ESDEE, AKZONOBEL, NEROLAC, WALPLAST, FOSROC**

Mob. 09850965452 Email-ngschondhi@gmail.com

709, Patilwadi, Opp. Nilima Hotel, Chendhare, Alibag - Raigad 402 201

**WE URGE YOU TO DONATE YOUR EYES**



# जन विज्ञान वेदिका

**प्रा. डॉ. सुदेश घोडेराव,** नाशिक
९४२२२५७६५४

सन १९८७ मध्ये, देशातील 'लोक विज्ञान चळवळी'तील सर्व संघटनांच्या नेतृत्वाखाली 'भारत जन विज्ञान जत्था' (BJVJ-८७) ही देशव्यापी चळवळ समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी सुरु करण्यात आली. बीजेव्हीजे-८७ च्या कार्यकर्त्यांच्या प्रेरणेतूनच पुढे २८ फेब्रुवारी १९८८ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून 'जन विज्ञान वेदिका' (आंध्र प्रदेश) या संस्थेची स्थापना करण्यात आली. लोक विज्ञान चळवळ दृढ करण्यासाठी संस्थेची दीर्घकालीन उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठेवण्यात आली.

१. लोकांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करून वैज्ञानिक मनोभाव रुजविणे.
२. वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या माध्यमातून लोकांमधील अंधश्रद्धा आणि गूढवादी प्रथांचे उन्मूलन करणे.
३. लोकांना भेडसावणाऱ्या समस्यांची मूळ कारणे शोधून त्यावर त्यांना वैज्ञानिक उपाय सुचविणे.
४. वंचितांपर्यंत विज्ञानाचे फायदे पोहोचविणे.
५. ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेला प्रोत्साहन देणे, राष्ट्रीय एकात्मता, स्वावलंबन, जागतिक शांतता, सामाजिक उन्नती आणि सांस्कृतिक चैतन्य वाढावे यासाठी प्रयत्न करणे.
६. पर्यावरणीय समतोल, जैवविविधता आणि पर्यावरणीय संवर्धनाद्वारे शाश्वत विकासासाठी पर्यावरण क्षेत्रातील संघटनांशी संलग्न राहून नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे.
७. लोककल्याण हे प्रमुख ध्येयविधान असणाऱ्या विविध क्षेत्रातील संशोधनाला प्रोत्साहन देणे.
८. वरीलप्रमाणे नियोजित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य कृतिकार्यक्रमांची आखणी करणे.

संस्थेची रचना आणि कार्यक्षेत्र :

जन विज्ञान वेदिका संस्थेला लोक JVV नावानेच ओळखतात. अनेक नामवंत शास्त्रज्ञ, नोकरशहा, शिक्षणतज्ज्ञ, व्यावसायिक, सार्वजनिक आणि खाजगी संस्थांचे कर्मचारी, महिला, विद्यार्थी, कृषी कामगार आणि कारागीर यासह समाजसेवेचा वसा घेतलेले काही लोकप्रतिनिधी असे अनेक समाजघटक JVV चे सदस्य आहेत. आज संस्थेची सदस्यसंख्या सुमारे ५० हजारांपर्यंत आहे. JVV संस्था 'ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क' (IPSN) आणि केंद्र शासनाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या 'नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन' (NCSTC) यांच्याशी संलग्न आहे. सदस्य व जनतेकडून मिळणाऱ्या स्वेच्छा निधीवर संस्थेचे कामकाज चालते.

संस्थेची रचना चौस्तरीय आहे. १) गाव/स्थानिक एकक, २) मंडल एकक, ३) जिल्हा एकक आणि ४) राज्य एकक. प्रत्येक एककाच्या स्तरावर कृतिकार्यक्रमांचा आढावा घेऊन आगामी नियोजनासाठी नियमितपणे बैठकांचे आयोजन होत असते.

शिक्षण, आरोग्य आणि विज्ञानप्रसार ही जन विज्ञान वेदिकेची प्रमुख तीन कार्यक्षेत्रे आहेत. परंतु त्याचबरोबर स्त्रीपुरुष समानता, महिला सबलीकरण, संस्कृती अशा काही कार्यक्षेत्रांसाठी उपसमित्यांची स्थापना केली आहे. विविध सामाजिक-वैज्ञानिक मुद्द्यांवर लोकांमध्ये जागरूकता व प्रबोधन करण्यासाठी प्रत्येक एकक स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यात शिक्षक, विद्यार्थी आणि विज्ञान स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण शिबिरे देखील आयोजित केली जातात. सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा आणि गूढ व अनिष्ट प्रथा यांच्या विरुद्ध संस्थेचा अथक परंतु शांततापूर्ण मार्गाने संघर्ष चालू असतो.

विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसाराच्या क्षेत्रात अनेक वर्षांच्या लक्षवेधी कामगिरीसाठी संस्थेला २००५ (आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र वर्षात) या वर्षाचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार केंद्र शासनाकडून प्रदान करण्यात आला होता.

**JVV आणि विज्ञान संप्रेषण**

आपल्या राज्यघटनेत प्रत्येक नागरिकासाठी काही

मूलभूत कर्तव्ये म्हणून विज्ञाननिष्ठ मनोभाव, मानवतावाद, शोधकता आणि सुधारणावाद यांचा अंतर्भाव आहे. त्याअनुषंगाने प्रचार प्रसार करण्यासाठी संस्था लोककला, पथनाट्य, नृत्य, जादू आणि दृक्श्राव्य अशा माध्यमांचा अवलंब करते. पुस्तक प्रदर्शने, प्रात्यक्षिके, वादविवाद, सादरीकरणे, फिरती विज्ञान प्रयोगशाळा यांचे आयोजन केले जाते.

JVV चे अनेक कार्यकर्ते इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि आकाशवाणीच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याव्यतिरिक्त स्थानिक दैनिके आणि नियतकालिकां-मध्ये नियमित लेखन करीत असतात. ग्रहण, उल्का, धूमकेतू किंवा गूढ वाटणाऱ्या खगोलीय घटनांमागील कार्यकारणभाव थेट लोकांमध्ये जाऊन समजावून सांगण्याचे उपक्रम राबविले जातात.

गेल्या सहस्रकातील असामान्य प्रतिभावंत, ज्यांच्या वैज्ञानिक कार्याचा औचित्यपूर्ण गौरव करण्यासाठी २००५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र वर्ष म्हणून साजरे करण्यात आले त्या अल्बर्ट आईन्स्टाईन यांचा पूर्णाकृती पुतळा संस्थेने उभारला आहे.

**JVV आणि शिक्षण**

हजारो सदस्य शिक्षकांसाठी उन्हाळी आणि हिवाळी शिबिरांत तसेच इतर वेळी आनंददायी अध्यापनाचे प्रशिक्षण JVV आयोजित करते आणि मुलांसाठी आनंददायक ठरतील अशा अध्यापनशास्त्रीय नवसंकल्पना कार्यान्वित करते. शिक्षक संघटनांशी सल्लामसलत करून त्यांच्या सहकार्याने विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवीनतम घडामोडींची माहिती शिक्षकांना मिळावी यासाठी प्रख्यात शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांच्या भेटी आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात. JVV शालेय अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकातील सामग्री व संकल्पनांचे देखील मूल्यांकन करते. बालोत्सव, आनंददायी शिक्षण, बालमेळावे, मुलांसाठी विज्ञान महोत्सव, विज्ञान प्रतिभा चाचणी यांचे वारंवार मोठ्या प्रमाणात आयोजन करते.

**JVV आणि आरोग्य**

सर्वांसाठी आरोग्य या धोरणानुसार प्रत्येकाला आरोग्यसेवा देणे ही राज्याची जबाबदारी आहे याबाबत लोकांचे प्रबोधन करण्यासाठी गतत कार्यशाळा आणि अधिवेशने आयोजित करते. ही संस्था एचआयव्ही / एड्स, गर्भलिंगनिदान चाचणी प्रतिबंधक कायदा आणि सार्वजनिक आरोग्यविषयक जागरूकता यांसारख्या आरोग्यासंबंधित विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित करते. जनस्वास्थ्य अभियान (पीपल्स हेल्थ मूव्हमेंट) चे सक्रिय भागीदार म्हणून JVV सरकारच्या आरोग्य धोरणांचे गंभीरपणे परीक्षण करीत असते.

**JVV प्रकाशन**

JVV चे एक प्रमुख सामर्थ्य म्हणजे त्यांची प्रकाशन शाखा. शालेय मुलांमध्ये ज्ञानलालसा आणि विज्ञान-तंत्रज्ञानाविषयी आवड निर्माण करण्यासाठी गतत १९९० पासून तेलुगू मुलांसाठी 'विद्यार्थी चेकुमुकी' हे सर्वाधिक खपाचे विज्ञान मासिक चालवत आहे. याशिवाय ही संस्था विज्ञानावरील विविध प्रकारची पुस्तके प्रकाशित आणि प्रसारित करीत असते. JVV सर्व स्तरातील लोकांसाठी संस्कृती, इतिहास, शिक्षण, आरोग्यविषयक साहित्य निर्मिती करते तसेच मुलांमध्ये वाचनाची सवय रुजविण्यासाठी नियमित उपक्रम राबवते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विविध विषयांवरील पुस्तिका, माहितीपत्रिका, विज्ञान बुलेटिन, विज्ञान दिनदर्शिका आणि विज्ञान दैनंदिनी प्रकाशित आणि प्रसारित करते. संस्थेने विविध सामाजिक-वैज्ञानिक विषयांवर आणि लोकप्रिय विज्ञानावर ३०० हून अधिक पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. JVV 'जन विज्ञानम' नावाचे एक मासिक मुखपत्र प्रकाशित करते.

**JVV आणि महिला**

'समता' हे JVV च्या महिला विभागाचे नाव आहे. यासाठी ही संस्था महिलांचे हक्क, महिला सबलीकरण, महिलांच्या समस्यांचा अभ्यास यासाठी उपक्रम चालवते. टीव्ही आणि मनोरंजनाच्या मालिकांमध्ये महिलांची दुर्बल, परवश, मिळमिळीत अथवा सर्व प्रकारच्या दुष्टपणाची अशी जी प्रतिमा उभी केली जाते त्याविरोधात निषेध नोंदवत लढा उभारण्यासाठी ही संस्था महिला संघटनांना पाठबळ देते. यासाठी गतत 'वनिता कला जत्था' हा संस्थेचा स्वतंत्र विभाग कार्यरत आहे.

**JVV आणि पर्यावरण प्रदूषणाविरुद्ध मोहीम**

JVV पर्यावरण संवर्धन, पर्यावरणीय समतोल, शाश्वत विकास इत्यादींबाबत लोकांमध्ये आणि धोरणकर्त्यांमध्ये जागरूकता आणण्यासाठी अनेक

प्रकारचे कार्यक्रम आयोजित करते. सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट (CSE) आणि संयुक्त संसदीय समिती (JPC) यांच्या अहवालांच्या आधारे शीतपेयांच्या हानिकारक परिणामांविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचा उपक्रम JVV चालवते. ही संस्था शाश्वत, पर्यावरणपूरक व गरजेनुसार बदलणाऱ्या कृषी, औद्योगिक, आर्थिक आणि ऊर्जा धोरणांना पाठबळ देते. नैसर्गिक संसाधनांचा अनिर्बंध वापर, रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या हानिकारक पातळीवरील वापराविषयी गतत जागरूकता निर्माण करते.

**JVV आणि लोकसंस्कृती**

जेव्हीव्ही असे मानते की, सध्याच्या सार्वजनिक जीवनात आर्थिक आणि राजकीय पातळीवरील घसरत चाललेल्या मूल्य प्रणालीविषयी समाजात एकतर असंवेदनशीलता दिसते किंवा त्यासोबत संगनमत केलेले दिसून येते. समृद्ध परंपरा, प्रवाही सांस्कृतिक वारसा, लोककला, सुरक्षित आणि प्रभावी स्वदेशी तंत्रज्ञान, भाषा आणि साहित्य, नीतिमूल्ये आणि शिष्टाचार अशा काळाच्या ओघात टिकून राहिलेल्या भारतीय मूल्यप्रणाली यांचा ऱ्हास होतांना दिसतो आहे. पाश्चिमात्य सभ्यतेचे अविवेकी व आंधळे अनुकरण यांचा तरुणाईवर जाणीवपूर्वक केलेला मारा यास कारणीभूत आहे. प्रस्थापितांचे हितसंबंध जपणारी राजकारणातली शोषक आर्थिक धोरणेच त्यास पोषक अशी दिसून येतात.

**जन विज्ञान वेदिका आणि IPSN**

लोक विज्ञान चळवळीचा (PSM²) एक नम्र परंतु प्रभावी पुरस्कर्ता म्हणून JVV ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क (IPSN) चा एक घटक सदस्य राहिला आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये कार्यरत लोक विज्ञान चळवळीतील सुमारे ३० विज्ञान संस्थांचा एक महासंघ म्हणजे IPSN. या महासंघातर्फे दर दोन वर्षांनी ऑल इंडिया पीपल्स सायन्स काँग्रेसचे आयोजन केले जाते. जागतिक सामाजिक मंच, आशिया सोशल फोरम, वर्ल्ड सायन्स काँग्रेस अशा आंतरराष्ट्रीय मंचांवरून होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये आंतरराष्ट्रीय सौहार्द, सहकार्य, जागतिक शांतता, बंधुता, वर्चस्ववादविरोधी आणि साम्राज्यवादविरोधी प्रचार प्रसाराच्या उद्देशाने महासंघ सहभाग नोंदवतो. संपूर्ण भारतभर साक्षरतेसाठी जनमोहिमेमागील केंद्रिय शक्ती म्हणजे भारत ज्ञान विज्ञान समिती; आणि JVV या समितीचाही एक अविभाज्य भाग आहे.

**शांततेसाठी विज्ञान : जेव्हीव्हीची घोषवाक्ये**

जन विज्ञान वेदिका भारतीय समाजाला वर्गांमध्ये विभागलेला समाज मानते; एक, अत्याचारित, शोषित आणि दुसरा शोषक. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या शक्ती आणि क्षमता जगातील कामगारांच्या श्रम आणि घामातून तसेच सर्वांच्या समान हक्काच्या नैसर्गिक संसाधनांच्या वापरातून निर्माण झालेल्या असूनही त्या मात्र शोषक वर्गाच्या ताब्यात आहेत. अशा प्रकारे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा खरा हक्कदार आणि उत्पादक शोषित बहुसंख्य वर्ग मात्र त्याच्या लाभांपासून मात्र वंचित आहे. जेव्हा जेव्हा उत्पादक शक्तींवरील शोषक वर्गाचे नियंत्रण निसटण्याची शक्यता निर्माण होते तेव्हा तोच शोषक वर्ग विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून धूर्तपणे युद्धयंत्रसामग्रीच्या साहाय्याने स्वत:ला सुसज्ज करतो आणि जागतिक शांतता धोक्यात आणतो. भारतासारख्या देशात तो शोषक वर्ग हाच मूलतत्त्ववादी असल्याने तो सत्ताधाऱ्यांशी संगनमत करून हे नियंत्रण कायम ठेवण्यासाठी धर्माचा देखील वापर करतो. जीवनातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एकाधिकारशाही विरोधात धुमसत असलेल्या या एकतर्फी, अवैज्ञानिक आणि अन्यायकारक समाजव्यवस्थेला नाकारत त्यात परिवर्तनासाठी JVV आपली कृतिशील विचारधारा तयार करते. म्हणून 'लोकांसाठी विज्ञान', 'शांततेसाठी विज्ञान', 'प्रगतिसाठी विज्ञान', 'सत्यासाठी विज्ञान', 'आत्मनिर्भरतेसाठी विज्ञान' इ अशी JVV ची प्रमुख घोषवाक्ये आहेत. JVV मानते की लोकांचे विज्ञानाशी नाते जोडून त्याविषयीची आवड निर्माण करीत वैज्ञानिक मनोभावाचा प्रचार केल्याने शोषणारहित नवीन लोकाभिमुख आणि लोकशाही समाजव्यवस्था दृढ आणि सक्षम करता येईल.

**(लेखक महा. अंनिसच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे राज्यकार्यवाह आहेत.)**

●



# निधी संकलनाचा नंदुरबार पॅटर्न

**प्रा. परेश शाह,** शिंदखेडा
९४२१४६५८६४

देशाच्या नकाशावर सर्वात मागास जिल्हा म्हणून ज्याची ओळख आहे असा नंदुरबार जिल्हा. गुजराथ आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांच्या सीमेलगत महाराष्ट्राच्या अगदी उत्तर टोकाला आहे. १९९८ मध्ये तत्कालीन धुळे जिल्हयाचे विभाजन होऊन १० पैकी ६ तालुक्यांचा नंदुरबार जिल्हा अस्तित्वात आला. सातपुड्याच्या डोंगररांगा आणि नर्मदा-तापीच्या खोऱ्याने व्याप्त असलेला हा जिल्हा आदीवासीबहुल आहे. कुपोषण आणि डाकीण प्रथेसारख्या घटनांनी कायम चर्चेत असणारा. जिल्हा निर्मितीनंतर विकासाची प्रक्रिया हळुहळू सुरु होते आहे. मात्र अजूनही औद्योगिकीकरण जवळपास नगण्य असलेला, फारसा मोठा व्यापार उदीम नसलेला, कोरडवाहू शेती हाच प्रमुख व्यवसाय असलेला हा प्रदेश. आरोग्य, शिक्षण या मूलभूत सुविधांचाही अभाव. जेथे पुरेसे सकस अन्न मिळणेही अनेकांना दुरापास्त, तेथे इतर सुविधांची वानवा असणारच.

मात्र कोणत्याही योजना तळागाळापासून सुरु करुन वंचितांना लाभ देतो हे दाखविण्यासाठी अनेक शासकीय योजनांचा शुभारंभ नंदुरबारपासून होतो. म्हणूनच की काय नंदुरबार लोकसभा मतदार संघाचा क्रमांकही ०१ असा आहे. आधार नोंदणी ही महत्त्वाकांक्षी योजना देशात सुरु झाली त्याची सुरुवातही नंदुरबार जिल्हयापासून केली होती. त्यासाठी दस्तुरखुद्द तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग नंदुरबारच्या टेंभली या खेडयात आले होते.

ही सर्व पार्श्वभूमी सांगण्याचे कारण असे की, अशा सर्व स्तरावर अभावग्रस्त असलेल्या जिल्हयातून 'अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिके'च्या वार्षिक विशेषांकासाठी मात्र संपूर्ण महाराष्ट्रभरातून सर्वाधिक निधी संकलन केले जाते. त्यामुळे तर नंदुरबार जिल्हयातील आपल्या सहकाऱ्यांचे कर्तृत्व अधिकच ठळक होते. विशेष म्हणजे एखादे यश एकदाच मिळाले तर कदाचित योगायोग म्हणता येऊ शकतो. पण सलग दुसऱ्या वर्षी हा उच्चांक आपल्या नंदुरबार जिल्हयातील शिलेदारांनी केला आहे. तो करतांना स्वतःचाच मागील वर्षाचा उच्चांक मोडीत काढला आहे.

काय करतात येथील कार्यकर्ते? कसे मिळवितात जाहिराती आणि देणग्या? मागतांना भिडस्तपणा जाणवत नाही का? नकार मिळाल्यास खजिल वाटते का? प्रतिसाद कसा मिळतो? प्रेरणा काय? हे सर्व जाणून घेण्यासाठी नंदुरबार जिल्हयातील काही साथींशी बातचीत केली. त्यातून त्यांच्या यशामागील परिश्रम, नियोजन, तळमळ उलगडत गेली.



**संतोष महाजन, (कार्याध्यक्ष, शहादा शाखा)**

संतोष महाजन हे पेशाने भाजीपाला विक्रेते व कमिशन एजंट आहेत. जेमतेम १२ वी पर्यंत शिक्षण झालेले. कोणत्याही सामाजिक कार्याची पार्श्वभूमी नाही. पण मागील दोन वर्षापासून सामूहिकरीत्या शाखा पातळीसोबत वैयक्तिक पातळीवर देखील निधी संकलन करतात. यावर्षी स्वतःच्या व्यक्तीगत संपर्कातून जवळपास ४००००/- (चाळीस हजार) रुपये गोळा केले. ते म्हणतात की, जशी शाखा पातळीवर देणगीदार, जाहिरातदार यांची यादी केली जाते तशी मी स्वतःचे नातेवाईक, मित्र, भाजी बाजारातील समव्यवसायिक विक्रेते, शेतकरी असे जे जे आपल्याला मदत करु शकतील अशा लोकांची अगदी आठवून यादी करुन ठेवतो. त्या प्रत्येकाला व्हॉट्सॲपवर आपले जाहिरातीचे दरपत्रक व अपील पाठवून देतो. प्रत्यक्ष भेटून वा फोनद्वारे संपर्क करतो. अंनिस काय काम करते, आमच्या शाखेचे बुकफेस्टिव्हल, द-दारुचा नव्हे द.दुधाचा, रक्तदान शिबिर यासारख्या चांगल्या उपक्रमांची माहिती वर्षभर दिलेलीच असते. मासिक पत्रिकेत काय काय असते, त्यामुळे आपली बुवाबाबांच्या शोषणातून कशी सुटका होते हे वेळोवेळी सांगितलेलेच असते. त्यामुळे यातील

बहुतेक जण परिचित असतात, त्यांना माझ्यामध्ये जे बदल घडलेत ते सर्व अं.नि.स. मुळेच आहेत याची त्यांना खात्री होते. या सामाजिक कामाला मदत करण्याचे माझे आवाहन त्यांना पटते. त्यातूनच रु.५०० पासून ५००० पर्यंतच्या देणग्या, जाहिराती मिळाल्या.

यासाठी संतोष हे जेथे जातात तेथे नातेवाईक, मित्रांमध्ये आपल्या कामाची चर्चा करतात, त्यातून नव्या ओळखी तयार करतात. या सर्व व्यक्तिगत जाहिरात / देणगीदारांशी नियमित संपर्क ठेवतात. त्यांना शाखेच्या उपक्रमांचे बातम्या, फोटो, व्हिडिओ पाठवत राहतात. त्यामुळे दरवर्षी मदत करायला लोकांची मानसिक तयारी झालेली असते. संतोष यांना सुरुवातीला भीती वाटायची. नेमके मुद्देसूद बोलता येत नव्हते. पण आता संघटनेच्या कामाची फाडफाड माहिती देऊन कोणताही संकोच न ठेवता बिनधास्त मदत मागतात, मिळते सुद्धा. जवळपास एकही व्यक्ती टाळाटाळ करीत नाही, नकार तर अजिबात देत नाहीत. अगदीच एखाद दुसऱ्या व्यक्तीने आता शक्य नाही पण मध्ये एखादया कार्यक्रमासाठी नक्की मदत करेन असे सांगितले असेल असा संतोष यांचा अनुभव आहे. या सामाजिक कार्यामुळे त्यांचा स्वतःचाच आत्मविश्वास वाढला असल्याची त्यांची भावना आहे.



**वसंत वळवी (नंदूरबार शाखा)**

जिल्ह्याचे प्रधान सचिव वसंत वळवी हे माध्यमिक शिक्षक असून अनेक वर्षे विनाअनुदानित शाळेवर काम करीत होते. आता शाळा ६० टक्के अनुदानावर आली आहे. तुलनेने नंदुरबार ही नवीन शाखा आहे. जेमतेम ८-१० वर्षे झाली आहेत. कीर्तिवर्धन तायडे (राज्य कार्यवाह) आणि वळवीसर हे दोन्ही एकाच शाळेवर शिक्षक आहेत. यावर्षी नंदुरबार शाखेने २,३१,०००/- इतके निधी संकलन केले आहे. वसंत वळवी आपला अनुभव सांगतांना म्हणतात की, आम्ही सर्वप्रथम देणगी/जाहिरातदारांच्या याद्या अद्ययावत करतो. मागील वर्षातील यादीत नवीन नावांची वाढ झाली पाहिजे हा कटाक्ष असतो. यावर्षी यादीप्रमाणे १८५ जणांशी संपर्क केला. त्यातील जवळपास ५० जण नवीन असतील. यादी करतांना मित्र, शिक्षक, विविध व्हॉट्सअॅप गृपवरील समविचारी मित्र साथी, वैज्ञानिक जाणिवा शिक्षक प्रशिक्षणात सहभागी शिक्षक, यासोबतच आपले सोशल मिडिया स्टेट्स नियमित बघणारे फॉलोअर्स यांची ब्रॉडकास्ट लिस्टच केली आहे. त्या सर्वांना आपले दरपत्रक व देणगीचे आवाहन पाठविले जाते. त्यानंतर फोनवर व प्रत्यक्ष संपर्क करतो. व्हॉट्सअॅपवरील आवाहन बघून काही मोजके जण १००० / ५०० रुपये देणगी पाठवून देतात. तसेच केवळ एका फोनवर ३० टक्के लोकांची देणगी मिळते असा अनुभव आहे. त्यासोबत स्वतः कमविणाऱ्या प्रत्येक क्रियाशील कार्यकर्त्याकडून आम्ही देणगी मागतो. मागील वर्षी प्रत्येकी १००० रुपये घेतले होते. यावर्षी वाढवून प्रत्येकी १५०० रुपये देणगी म्हणून घेतले. त्याचबरोबर आम्ही मी आणि माझे तीन अशी योजना राबविली. यात क्रियाशील कार्यकर्त्यांने स्वतः १५०० रुपये द्यावेत पण त्यासोबतच आणखी तीन देणगीदार / जाहिरातदार यांचेकडून निधी मिळवून द्यावा असा आग्रह केला. त्यामुळे निधी जमविणाऱ्यांची संख्या वाढली, निधी संकलकांचा सहभाग वाढला. नवीन देणगीदार मिळाले. निधी संकलनाची मुदत संपण्याच्या शेवटच्या टप्यात शाखेचे १,९१,००० रुपये जमले होते व जिल्हयाच्या रकमेलाही राऊंडफिगर होण्यासाठी ८००० रुपये कमी पडत होते. विनायक सावळेंनी फोन केला. त्यानंतर मोलगी या अगदी नवीन शाखेवर त्यांनी २००० रुपये जमविले होते. तेथील कार्याध्यक्षांकडून कार्यकत्यांची यादी मागवून घेतली. त्यात नोकरदार असल्यास त्याला टिकमार्क करुन मागविली. त्या सर्वांना व्यक्तिगत फोन करुन तेथील शाखेतून २७,०००/- रुपये निधी मिळाला. शिबिरार्थी शिक्षकांच्या गृपवर अपील टाकून अपवाद वगळता प्रतिसाद नव्हता. त्या सर्वांना व्यक्तिगत फोन करुन मासिकाबद्दल माहिती दिली ४०० रुपये वर्गणी व संघटनेला फक्त १०० रुपये असे ५०० रुपये मागितले, त्यातून १८,००० रुपये मिळाले. हे सर्व करतांना लक्षात येते की, आपले काम जर लोकांना माहीत असेल तर लोक नक्कीच मदत करतात. त्यासाठी वर्षभर आपल्या हितचिंतकांना आपल्या कामाची माहिती देत राहावे मग निःसंकोचपणे आपल्याला त्यांच्याकडे मदत मागता येते. तरीही आता असे वाटते की, अजूनही काही जण सुटून गेले आहेत.



**हंसराज महाले, (तळोदा), कार्यवाह, प्रशिक्षण विभाग, नंदुरबार जिल्हा**

हंसराज महाले हे सातपुडयातील एका आदिवासी आश्रमशाळेत शिक्षक आहेत. मागील वर्षी तळोदा शाखेतून रुपये ५०,००० च्या जाहिराती / देणग्या मिळविल्या होत्या. या वर्षी मात्र हा आकडा १,३५,००० एवढा झाला आहे. याबाबत आपला अनुभव सांगतांना हंसराज महाले म्हणतात की, आपल्या कामामुळे व त्याच्या प्रसिध्दीमुळे लोकांकडून मदत मिळते. मी दैनिक लोकमतचा तळोदा प्रतिनिधी आहे. त्याचा देखील निधी संकलनात चांगला उपयोग झाला. विशेषतः डाकीण प्रश्नाबाबतची लेखमाला व डाकीणीच्या घटनांची सोडवणूक करतांनाच्या छापून आलेल्या बातम्या यामुळे एक वेगळी ओळख तालुक्यात झाली आहे व हे खूप चांगले काम आहे अशी भावना लोकांत आहे. त्यामुळे सहज मदत मिळाली. काही ठिकाणी तर लोकांनी आठवणीने मागील बाकी देखील दिली.



**रवींद्र पाटील (शहादा), जिल्हा कार्याध्यक्ष, नंदुरबार.**

रवींद्र पाटील सर हे शहादा तालुक्यातील एका शाळेवर शिक्षक आहेत. शिपाई पदापासून नोकरी सांभाळून परीश्रमपूर्वक एम. ए., बी. एड. पर्यंत शिक्षण केले व आता शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. आपला अनुभव सांगतांना रवींद्र पाटील सर सांगतात की, आम्ही नंदुरबार जिल्हा म्हणून ९,६५,००० रुपये एवढया देणग्या / जाहिराती मिळविल्या, हे सांगतांना मला अभिमान वाटतो. सर्वप्रथम राज्य कार्यकारिणी आल्याबरोबर जिल्हा बैठक घेऊन जसे राज्याच्या बैठकीत जिल्हयांचे इष्टांक ठरतात तसे आम्ही शाखेचे इष्टांक निर्धारित केले. त्यासाठी सर्वप्रथम जाहिरात व देणगीदारांच्या यादया अद्ययावत करणे त्यासोबत व्यक्तिगत व सामूहिक फिरण्याचे नियोजन करणे, प्रत्यक्ष, फोन व समाजमाध्यमांद्वारे संपर्काचे काटेकोर नियोजन करणे याबद्दल सगळयांना प्रबोधन केले जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण सतत काही ना काही प्रबोधन, संघर्ष, उपक्रम केलेले असतील तर लोक नक्कीच मदत करतात असा अनुभव आहे. मात्र मदत मागतांना लाजायचे नाही, संकोच करायचा नाही, नकार मिळाल्यास निराश व्हायचे नाही; हे सर्वांना बजावून सांगितले जाते. मी स्वतः शाखेच्या नियमित मदत करणाऱ्यांच्या यादीतील हितचिंतकांकडून जवळपास दोन लाख व व्यक्तिगत संपर्कातून साठ हजार रुपये गोळा केले आहेत. पूर्वी शाखेत फक्त विनायक सावळे निधी संकलन करायचे, नंतर मी व सावळे करु लागलो. पण हळुहळू आम्ही निधी संकलन करणाऱ्यांची संख्या वाढविली. त्यामुळे आता काम सोपे झाले आहे. दरवर्षी संपर्क यादी अद्ययावत करतो. शक्यतो मागील देणगीदारांपैकी अपवाद वगळता कोणीही कमी होत नाही. मात्र दरवर्षी नवीन लोकांची भर पडते. नियमित मदत करणाऱ्यांना मागील वर्षापेक्षा रक्कम वाढवून देण्याचा आग्रह करतो. अनुभव असा आहे की, ७० टक्के लोक मागील प्रमाणेच मदत करतात, १०-२० टक्के लोक वाढवून देतात व १० टक्के लोक आता मागील प्रमाणेच देतो, पण मध्येच शाखेच्या कार्यक्रमाला काही लागल्यास नक्की मदत करीन, असे सांगतात. यावर्षी जवळपास २५० लोकांपर्यत पोहोचण्याचा प्रयत्न केला. खरेतर निम्मे देणगीदार फोनवरच सांगून देणगी देऊ शकतात अशी शहाद्यातील स्थिती आहे. पण प्रत्यक्ष भेट महत्त्वाची म्हणून फोनवर मदत मागत नाहीच. सर्वांची ब्रॉडकास्ट लिस्ट आहे. मोठया कार्यक्रमांना सर्वांना बोलवतो, कार्यक्रमाच्या बातम्या, फोटो, व्हिडीओ नियमित पाठवत राहतो. विशेषांकाचा स्थानिक प्रकाशन सोहळा करतो, प्रत्यक्ष जाऊन अंक पोहोच करतो. प्रत्येक कमविणारा कार्यकर्ता कुवतीनुसार देणगी देतो.

या सर्व अनुभवावरुन काही समान व ठळक मुद्दे लक्षात येतात.

१) व्यक्तिगत मित्र, नातेवाईक यांचेकडून ५००-१००० रुपयाच्या देणग्या मिळवण्यावर भर दिला आहे. ज्याला आपण जनाधारित चळवळ म्हणतो त्याअर्थाने हे खूपच महत्त्वाचे आहे.

२) देणगीदार/जाहिरातदारांच्या याद्या अद्ययावत ठेवणे, यात नवीन नावांची भर करणे हे महत्त्वाचे आहे.

३) या हितचिंतकांना विविध माध्यमांतून सतत संपर्कात राहून आपले कार्यक्रम, उपक्रम कळवित राहिले पाहिजे. शक्य तेव्हा मोठया कार्यक्रमांना निमंत्रित केले पाहिजे.

४) शाखा सक्रिय असेल व प्रत्येक क्रियाशील कार्यकर्त्याची अंनिसच्या कामातून स्वतःची ओळख तयार होते आणि मदत सहजच मिळते.

५) निधी संकलनात श्रमविभागणी करुन जितके जास्त कार्यकर्ते सहभागी होतील तेवढे निधी संकलन जास्त होते.

६) सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण चांगले काम करीत आहोत तर कोणत्याही संकोचाशिवाय, भीड किंवा भीती न बाळगता मनमोकळेपणाने लोकांकडे मदत मागितली पाहिजे. प्रसंगी नकार मिळाला तरी नाउमेद न होता आपले काम चालू ठेवले पाहिजे. हेच या अनुभवांचे सार आहे.

वरील अनुभव महाराष्ट्रातील सर्वच कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरतील असे वाटते. ज्या ठिकाणी निधी मिळण्यासाठी चांगली संधी व वातावरण आहे, मात्र तुलनेने निधी संकलन कमी होते अशा ठिकाणी हे अनुभव मार्दर्शक ठरावेत. कोठून सुरुवात करु, कसे पैसे मागू, अशा प्रश्नांची उत्तरे यातून मिळू शकतील. दुसऱ्याही अनेक साथींचा निधी संकलनात वाटा आहे. परंतु प्रातिनिधिक चार साथींचे अनुभव येथे दिले आहेत. ते सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरतील अशी खात्री आहे.

निधी संकलनातील वाढ म्हणजे संघटनेची, कार्याची, कार्यक्रमांची, उपक्रमांची वाढ. अधिकाधिक लोकांपर्यंत विवेकाचा आवाज पोहोचणार. पर्यायाने पुन्हा निधी संकलनात वाढ.

**(लेखक महा. अंनिसच्या निधी व्यवस्थापन विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.)**

●

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे आपण आधारस्तंभ आहात! समिती आपली ऋणी आहे!

### छ.संभाजीनगर जिल्हा : छ.संभाजीनगर शाखा

| | | |
|---|---|---|
| डॉ. रश्मी बोरीकर | खंडेराव विठ्ठलराव अंबुलगेकर | सुरासे वंदे मातरम प्रा. मा. शाळा |
| श्रीधर मुळे, अभियान संस्था | के. ई. हरिदास, सत्यशोधक समाज | आ. डॉ. कल्याण वैजीनाथ काळे |
| पुंडलिक शिरसाट, जळगाव घाट | डॉ. कृष्णा रामचंद्र भावले | ज्ञानप्रकाश मोदानी सर्वोदयी |
| संजय अष्टूरकर | भावना गाढे, नागसेन विद्यालय | मधुकर तायडे, जळगाव |
| नागेश राव | करुणा गंगावणे, स्नेहदिप संस्था | |

### लातूर जिल्हा : लातूर शाखा

| | | |
|---|---|---|
| डॉ. शैलजा बरूरे | राजेंद्र कांबळे | प्रशांत दगडू शेरकर |
| प्रसन्न कार डेकोर | ज्योती ढगे | डॉ. शैलजा बापरे |
| दुर्गा मोटर्स, लातूर | शारदा प्रोव्हीजन स्टोअर्स (कोटलवार) | डोंगरे मंगल यल्लाप्पा |
| शोभा माने | आनंद बिराजदार | डॉ. दिनकर बिरादार |

### धुळे जिल्हा : धुळे शाखा

| | | |
|---|---|---|
| डॉ. सुरेश बिऱ्हाडे | तुळजाई प्रोव्हीजन (राजीव गांधी) | डॉ. प्रविण डी. बोरुडे |
| दिलीप खिवसरा | डॉ. अभिनय दरवडे | डॉ. शरद वाणी |
| ॲड.जे.टी. देसले | डॉ. अमित बाफना | जयमाताजी ट्रान्सपोर्ट |
| रणजित शिंदे (बाळासाहेब नाशिककर ज्वेलर्स) | चेतना डायनिंग हॉल | |



# महा. अंनिसची खबरबात



**अनिल शोभना वसंत,** पालघर
९८२३२८०३२७

**आधुनिक अंधश्रद्धा पोलखोल अभियान**

महा–अंनिसच्या विविध उपक्रम विभागातर्फे २० ते २६ ऑक्टोबर या दरम्यान राज्यभर आधुनिक अंधश्रद्धा पोलखोल अभियान राबविले गेले. हे नवीन अभियान कार्यकर्त्यांना यशस्वीपणे राबवता यावे, त्यांना आधुनिक अंधश्रद्धांबाबत व्यवस्थित मुद्देसूद मांडणी करता यावी, नवीन चमत्कारांचे प्रयोग शिकता यावेत यासाठी महा–अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे यांचे चमत्कारांच्या प्रयोगासाहित सखोल मार्गदर्शन गुगल मीटवर रविवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आले.

**चमत्कारांच्या प्रयोगाचे आयोजन**

**गंगापूर:** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, शिरेगाव व राजाराम पाटील विद्यालय, कणकोरी, ता. गंगापूर या ठिकाणी 'चमत्कारांचे प्रयोग व त्या पाठीमागे असलेले वैज्ञानिक तत्व' या विषयांवर दोन्ही ठिकाणी सप्रयोग व्याख्यान झाले.

**नवी मुंबई:** सानपाडा शाखेतर्फे, चमत्कारांमागील विज्ञान कार्यक्रमाचे सादरीकरण १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी करण्यात आले. नेचर फ्रेंडस सोसायटी (NSF) पनवेल, आयोजित साहस व निसर्ग हिवाळी शिबीर, शांतिवन – नेरे, जिल्हा रायगड येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महा. अंनिसचे कार्यकर्ते मा. उल्हास ठाकूर व अशोक निकम हे सहभागी होते.

**चमत्कार सत्यशोधन दिन**

**कल्याण:** २१ सप्टेंबर या चमत्कार सत्यशोधन दिनानिमित्त, महा. अंनिस, कल्याण शाखेच्या सौ. वंदना पगारे यांनी १४ सप्टेंबर २०२३ रोजी एन आर सी स्कूल, मोहने येथे चमत्कार व त्या मागील विज्ञान मुलांना वेगवेगळ्या प्रयोगांद्वारे दाखविले व समजावून सांगितले. तर दि. २४ सप्टेंबर २०२३ रोजी सोशल एज्युकेशन मुव्हमेंट ($SEM^2$), ठाणे जिल्हा आयोजित कार्यक्रम उत्तम जोगदंड यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार सादरीकरण व विश्लेषण केले. यामध्ये प्रिया कदम, प्रज्ञा चव्हाण, डॉ. सुषमा बसवंत, ॲड. आरती हटकर, हनुमंत देडगे यांचा सहभाग होता

**चमत्काराच्या विरोधात केली तक्रार**

**नागपूर:** माती खणताना देवीसदृश मूर्तीचा शिरोभाग मिळाल्यामुळे चमत्कार झाला अशी बातमी पसरली. नागपूर शाखेचे कार्यकर्ते ज्या ठिकाणी ही घटना घडली तेथे गेले. महा. अंनिस कार्यकर्ते रवी सहारे सरांनी निरीक्षण करून याबाबत प्रबोधन केले. महा. अंनिस कार्यकर्त्यांनी जरीपटका पोलीस स्टेशन, नागपूर येथील पोलीस निरीक्षक यांना यामागील अंधश्रद्धा निर्मूलनाची भूमिका सांगितली आणि त्या दिशेने तपास करून 'जादूटोणा विरोधी कायदा'नुसार पुढील योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निवेदन दिले.

**फटाकेमुक्त दिवाळी अभियान**

**धुळे:** महा. अंनिस तर्फे प्रदुषणमुक्त दिवाळी अभियानाबाबत सतमाने, रेवाडी, लामकानी येथील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. महा. अंनिसचे धुळे जिल्हा पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी दररोज विविध शाळेत जाऊन प्रदूषणमुक्त दिवाळी अभियान राबविले. विद्यार्थांना प्रदूषणमुक्तीचे महत्त्व समजावून सांगितले. फटाके खरेदी न करता वाचलेल्या पैशातून छान छान पुस्तके, आपले छंद जोपासण्याचा संकल्प करूया आणि गरजूंना मदत करूया असे आवाहन देखील विद्यार्थ्यांना केले. यावेळी रेवाडीचे शिक्षक एस आर वाघ, एस. आर. दुसाने, बी. टी. माळी, पाटील सर, श्रीमती सोनवणे मॅडम, लामकानी येथील मुख्याध्यापक बाविस्कर आदींचे सहकार्य लाभले.

**बीड:** यशवंत विद्यालय, संस्कृती विद्यालय, बीड येथे फटाकेमुक्त दिवाळी उपक्रम राबाविण्यासाठी सविता शेटे यांच्यातर्फे कार्यक्रम घेण्यात आला.

**वर्धा:** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, प्रदुषणमुक्त दिवाळी प्रबोधन कार्यक्रम भगत सरांच्या पुढाकाराने घेण्यात आला. या वेळी राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी मार्गदर्शन केले.

**नागपुर:** शाखेद्वारा प्रदूषणमुक्त दिवाळी, हे अभियान विदर्भ बुनियादी हायस्कूल और जुनियर कॉलेज, सक्करदरा येथे विद्यार्थ्यांना प्रदूषण आणि त्यांचे शरीरावर पडणारे वाईट परिणाम याविषयी माहिती देण्यात आली. त्याबद्दलची

संकल्पपत्रे त्यांच्याकडून भरून घेतली. या अभियानाच्या यशस्वितेसाठी राज्य सरचिटणीस संजय शेंडे, मंगेश राऊत, कार्तिक मसराम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या वेळी कालेजचे उपप्राचार्य डॉ. अविनाश कोकाटे, समन्वयक विनायक बेले, विकास मोटघरे, विनय देवतळे, सौ. स्मिता बावनकुळे, सौ. अर्चना ढोके, प्रकाश रंगारी, नरेश तम्मेवार, स्विटी बारई, कोमल अवथे इत्यादि उपस्थित होते.

**चंद्रपूर:** विद्यामंदिर हायस्कूल, ऊर्जानगर येथे जिल्हा कार्याध्यक्ष पी.एम. जाधव यांची फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला जिल्हा प्रधान सचिव नारायण चव्हाण, अतिथी नरेंद्र रहाटे, डी.आर. वानखेडे मुख्याध्यापक, देवराव कोंडेकर राजा वेमुला, माजी अध्यक्ष, राजीराम भजनकर, नितीन राव सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळेच्या दुर्गापूर येथील गरजू विद्यार्थ्यांना देवराव कोंडेकर, कार्याध्यक्ष महा अंनिस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते नितीन राव यांच्या सहयोगाने नोटबुक व पेनचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुळसंगे मॅडम यांनी केले तर आभार मेश्राम मॅडम यांनी मानले.

**विवेक जागर दिन**

**वाशीम:** डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या जन्मदिनानिमित्त आणि मिलिंद सावदेकर यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र अंनिस वाशिम शाखा कार्याध्यक्ष पी एस खंदारे व मिलिंद सावदेकर यांनी गरीब व गरजू रुग्णांसाठी रक्तदान केले.

**लासूर:** डॉ नरेंद्र दाभोलकर यांचा जन्मदिवस हा विवेक जागर दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी भास्कर बनसोडे, जिल्हा कार्याध्यक्ष यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जीवनावर व कार्याचा संक्षिप्त स्वरूपात अहवाल सादर केला. या प्रसंगी प्रकाश सोनवणे शाखा कार्याध्यक्ष, डॉ विकास संगेकर, ज्ञानेश्वर वाघचौरे पाटील, गोविंद हिवाळे, प्रशांत दाभाडे, गौतम गवई, मच्छिंद्र पानकर, किशोर पवार, इ. हजर होते.

**संविधान बांधिलकी महोत्सव**

**डोंबिवली:** संविधान बांधिलकी महोत्सव अंतर्गत २६ नोव्हेंबर २०२३ रोजी कल्याण येथील बी के बिर्ला महाविद्याल येथे डोंबिवली शाखेतर्फे परेश काठे यांनी संविधान दिनानिमित्त 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास – एक मुलभूत कर्तव्य' या विषयावर व्याख्यान दिले तसेच चमत्कार प्रयोगांचे सादरीकरण देखील केले. यावेळी बिर्ला कॉलेजचे डायरेक्टर डॉ. नरेश चंद्र, मुख्यध्यापक तसेच उपमुख्याध्यापक व विविध विभागप्रमुख, शिक्षकवृंद उपस्थित होते.

**नागपूर:** माजी सनदी अधिकारी मा. ई. झेड. खोब्रागडे व समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक आयुक्त मा. सिद्धार्थ गायकवाड, माजी न्यायाधीश बी जी कोळसे पाटील, मिलिंद पखाले अशा मान्यवरांसोबत महाराष्ट्र अंनिसचे पदाधिकारी व कार्यकर्ते रन फॉर संविधान मॉर्निंग वॉकच्या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून जिल्हा अध्यक्ष मा. जगजीत सिंग यांनी संविधान बांधिलकी महोत्सवाची सुरुवात झाल्याचे जाहीर केले. यावेळी राज्य सरचिटणीस संजयजी शेंडे, डॉ. अमिताभजी पावडे, गौरव आळणे, डॉ. सुरेश साखरे, प्रा. अजय चौधरी, शशी रायपुरे, लता ढोक, संगीता आळणे, रोशन गोस्वामी, बालचंदजी नाईक, आनंद कोहाड, अरुण शेंडे, ताराचंद पखिडे, बबन गायकवाड, बाबा भालेराव, विलास भालेराव इत्यादी मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.

**लासूर:** शाखेच्या वतीने संविधान दिनाच्या निमित्ताने दि.२६ नोव्हेंबर रविवार 'प्रास्ताविका व संविधानावरती बोलू काही' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले. या कार्यक्रमासाठी महा अंनिसचे भास्कर बनसोडे, प्रकाश सोनवणे, ज्ञानेश्वर वाघचौरे, किशोर पवार, गोविंद हिवाळे, मच्छिंद्र पानकर, प्रशांत दाभाडे, इ. पदाधिकारी उपस्थित होते.

**मानस मैत्र शिबिर**

**रायगड:** मानसिक आरोग्य ही एक दुर्लक्षित बाब राहिली आहे. मानसिक आरोग्याचा त्रास असलेल्या व्यक्ती डॉक्टरकडे न जाता त्या मांत्रिक, बुवा व बाबा यांच्या आहारी जातात. त्यासाठी महाराष्ट्र अंनिस या विषयावर प्रबोधन करत असते. या प्रबोधनासाठी समाजात मानसमित्र तयार करण्याचे काम अंनिस कडून प्रत्येक वेळ होतच असते. त्याचाच एक भाग म्हणून या शिबिराचे आयोजन केले गेले होते. या शिबिरासाठी महा अंनिस उपाध्यक्ष डॉ. प्रदीप पाटकर यांनी शिबिराचे प्रास्ताविक केले व मानसिक आरोग्य विभागाचे सहकार्यवाह डॉ अनिल डोंगरे यांनी शिबिरात विविध विषयांवर उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. एखाद्या मानसमित्राने एखाद्या मानसिक आजाऱ्याचे काऊसिलिंग कसे करावे याचे मार्गदर्शन तेजल खेडेकर व देवयानी पाटेकर यांनी केले. या शिबिरासाठी रायगड, नवी मुंबई, ठाणे व मुंबई या जिल्ह्यांमधून कार्यकर्ते उपस्थित होते.

●

# गणितप्रेमी

सूरज उर्मिला सुनील

सुनील हा एक सामान्य शेतकरी होता. त्याची मुलगी सायली ही अभ्यासात खूप हुशार होती. तिने बारावीत इतके गुण मिळवले की, तिला परदेशी शिकण्याची संधी मिळाली. सर्वांना आनंद झाला. पण सुनीलला चिंता वाटू लागली, 'आपण तर खूपच गरीब आहोत. एवढे पैसे कुठून आणणार?' त्याला सावकाराकडे जाण्याशिवाय पर्याय नव्हता. पण त्या गावातला सावकार हा खूपच लोभी होता. त्यामुळे तो आपल्याला लुबाडेल अशी सुनीलला भीती होती. त्याने सायलीला त्याची अडचण सांगितली. ती म्हणाली, बाबा, जा तुम्ही त्या सावकाराकडे. पण मी सांगते तसं करा. तिने वडिलांच्या कानात एक युक्ती सांगितली.

सुनिल सावकाराकडे गेला आणि त्याची पैशाची गरज मांडली. शिकार आपल्याकडे येताना पाहून सावकार खुश झाला. सावकार म्हणाला, 'बोल, तुला किती पैसे पाहिजेत?' जास्त नकोत मला. माझ्या दोन अपेक्षा आहेत तेवढ्या पूर्ण करा. माझ्याकडे गाडी, घर, जमीन अशा २६ वस्तू आहेत. त्या सगळ्या तुम्ही खरेदी करा. त्याच्या किमती मात्र आपण १ रुपयापासून सुरुवात करून अशा ठरवूया. घरातल्या बल्बचे १ रुपये द्या. कोंबडीचे २ रुपये द्या. खुर्चीचे ४ च द्या, गायीचे फक्त ८ रुपये. अशा एकेका वस्तूच्या किंमती दुप्पट करत तुम्ही माझ्या सगळ्या वस्तू खरेदी करा. सावकार लगेच तयार झाला. अख्खी प्रॉपर्टी इतक्या कमी किमतीत मिळणार म्हटल्यावर तो इतका हवेत तरंगू लागला की, सुनीलने आणलेल्या प्रस्तावाच्या कागदपत्रावर त्याने लगेच सही केली.

दुसऱ्या दिवशी सगळे लोक सुनीलच्या घरापुढे जमले. वकील आले. सावकारही हसत हसत आला. सुनील आणि त्याची मुलगी सायली एक एक वस्तू घराबाहेर आणत त्याची किंमत सांगू लागले. बल्ब १ रुपये. सावकाराने १ रुपया दिला. कोंबडी २ रुपये. खुर्ची ४ रुपये. गाय ८ रुपये. पंखा १६ रुपये. बादली ३२ रुपये. टेबल ६४ रुपये. बकरी १२८ रुपये... सावकार रात्री मेजवानी करायची स्वप्नं बघत सुनीलच्या हाती पैसे देत राहिला. सुनील एकेका वस्तूचे पैसे दुप्पट करत राहिला.

२५६, ५१२, १०२४, २०४८, ४०९६, ८१९२, १६३८४, ३२७६८, ६५५३६, अठरावी वस्तू – दुचाकी गाडीची किंमत आहे १,३१,०७२ रुपये.

आता सावकार जरा शांत झाला. इथून पुढचे पैसे द्यायला त्याला घरातल्या तिजोरीतून पैसे आणावे लागले.

एकोणीसावी वस्तू – २,६२,१४४ रुपये

विसावी वस्तू – ५,२४,२८८ रुपये

एकविसावी वस्तू – १०,४८,५७६ रुपये

बाविसावी वस्तू – २०,९७,१५२ रुपये

काय? वीस लाख? हे कसं शक्य आहे? सावकाराला घाम फुटला. त्याने कॅल्क्युलेटरवर हिशेब तपासून पाहिला. सुनील बरोबर किंमत सांगत होता.

तेविसावी वस्तू – ४१,९४,३०४ रुपये

चोविसावी वस्तू – ८३,८८,६०८ रुपये

'सावकार धपकन खाली बसला. 'हे मी काय करून बसलो? म्हणत त्याने डोक्याला हात लावला. 'अहो सावकार 'काका, घर आणि जमिनीची किंमत तरी ऐका की' सायली म्हणाली.

पंचविसावी वस्तू – घराची किंमत आहे १,६७,७७,२१६

आणि शेवटची सव्विसावी वस्तू – जमिनीची किंमत – ३,३५,५४,४३२ रुपये

म्हणजे एकूण मिळून सहा कोटी एक्काहत्तर लाख आठ हजार आठशे त्रेसष्ठ रुपये झाले.

सावकार मोठ्याने रडायला लागला. स्वार्थी माणसाची फजिती झाल्यामुळे गावातल्या सर्व लोकांनी एकच जल्लोष केला.

गोष्ट कशी वाटली हे ९४२३३९५०९७ या व्हाट्सअप क्रमांकावर नक्की कळवा.


गणितप्रेमी कोडे क्र. १२ चे उत्तर – ४२ घड्या माराव्या लागतील.

•



# विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. १७

– उत्तम जोगदंड



**आडवे शब्द:**

६) ३ जानेवारी या दिवसाचे महत्त्व हे आहे.

९) देश, प्रदेश इत्यादीची भौगोलिक सीमा दाखवणारे चित्र

११) दिशा दाखवणारे उपकरण

१४) झाडाचे किंवा फळाचे आवरण

१६) आझाद हिंद सेनेचे संस्थापक

२०) औषधी आणि पूजेसाठी ज्ञात असलेले एक झुडुप, कापूस

२१) सावित्रीमाई आणि जिजामाता यांच्या जयंती दरम्यानचा महा. अंनिसचा एक उपक्रम

**उभे शब्द**

१) शास्त्रीय प्रयोगांत वापरला जाणारा पदार्थ

२) पावसापासून बचाव करण्याचे साधन

३) डोक्यावरील केस, त्वचेला होणारा एक रोग

४) मालदीव देशाची राजधानी

५) रेशमाचे किडे या झाडावर वाढतात

७) एक जर्मन तत्वज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ कार्ल **

८) वीज निर्माण करणारे यंत्र

१०) विशाल माशाची एक प्रजाती

११) भारताचे एक प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ, यांच्या नावे अणुशक्ती केंद्र आहे.

१२) म. गांधी यांनी प्रकाशित केलेले एक साप्ताहिक ** इंडिया

१३) जगातील पहिली आण्विक पाणबुडी

१४) 'शामची आई' या पुस्तकाचे लेखक

१५) वेल

१७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील रामजी यांचा सैन्यातील हुद्दा

१८) पृथ्वीचा किंवा कोणत्याही ग्रहाचा उपग्रह

१९) हाताचा एक भाग

**(उत्तर पुढील अंकात)**

## विवेक–विज्ञान शब्दकोडे १६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ ए | क | ल | २ व्य | | ३ पा | य | था | ४ गो | र | स | | ५ ह | ६ मा | ७ स |
| | | | स | | | | | दा | | | ८ ठा | | ९ या | न |
| १० सं | वि | धा | न | बां | धि | ११ ल | की | म | हो | त्स | व | | | ल |
| त | | | वि | | | स | | | | | | १२ उ | | ए |
| १३ तु | १४ ती | | १५ रो | हि | त | | १६ आ | भा | १७ सी | | | १८ द | ग | ड |
| १९ का | स | | धी | | | २० वी | | | व्ही | | २१ ला | | | मा |
| रा | | | २२ पं | डि | २३ त | ज | २४ वा | ह | र | ला | ल | ने | ह | रू |
| २५ म | मी | | ध | | ज्ञ | | ह | | म | | ब | | | कु |
| | | २६ जा | र | वा | | २७ ट | न | | न | | २८ हा | तो | डा | |
| २९ जे | ट | | व | | ३० गॉ | र्की | | ३१ हॅ | | | दू | | | ३२ सा |
| म्स | | ३३ मुं | डा | | | | ३४ अ | ले | क्झां | ड | र | फ्ले | मिं | ग |
| ३५ ग्रँ | प्री | | | ३६ न्यू | ३७ ट | न | | | | | शा | | | र |
| ट | | ३८ ज | स्त | | प्पा | | ३९ स्टिं | ग | ४० रे | | स्त्री | | | |
| ड | | नु | | ४१ र | | ४२ ग | | | डि | | | ४३ डा | | ४४ फ्ले |
| ४५ फ | टा | के | मु | क्त | दि | वा | ळी | | ४६ ओ | सि | रि | स | रे | क्स |

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे आपण आधारस्तंभ आहात!
## समिती आपली ऋणी आहे!

### पुणे जिल्हा : पिंपरी चिंचवड शाखा

मा.मानव कांबळे
ॲड. मनीषा महाजन
ॲड. रमेश महाजन
बाळासाहेब घस्ते
क्रांती पोतदार
अशपाक पिंजार
नवजीवन हॉस्पिटल
सुदामे हॉस्पिटल
अरुणा काळे
सुविधा हॉस्पिटल
योगेश आपुणें
संतोष भवर
रोहित बोर्लिकर
निखिल पाटील
सुशील कोल्हे
भटुलाल बागुल
भिकाजी चव्हाण
सिताराम नरके
बुद्धीसागर
प्रा.सुरेखा कटारिया
सागर गावडे
नितीन खलाने
संतोष भवार
दर्शन देवकांत
राजकुमार माळी
प्रतीक्षा मिरजी
भावना फुलझेले


### रत्नागिरी जिल्हा : खेड शाखा

सरोज समाधान पैठणे
तुकाराम भागोजी काताळे
अजय आत्माराम तोडकरी
संजय आत्माराम शिगवण
गजेंद्र रामराव बेंद्रे
प्रकाश दत्ताराम चव्हाण
योगेश प्रकाश मोडसिंग
मुखत्यार इस्माईल कावलेकर
संतोष धोंडू गांगरकर
राजेद्र रामचंद्र चांदीवडे
विजय दाजी बाईत
सुभाष गंगाराम आंबेडे
अक्षय राजेंद्र पवार
सरवर मोहिद्दीन कुडूपकर
संदीप गणपत गमरे
अशोककुमार ओंकार जगताप
संदीप भगवान बड़बे
भिकू शांताराम जाधव
प्रविण बाळाजी गिते
आत्माराम गोपाळ कदम
शैलेश सिध्दार्थ सकपाळ
प्रदीप श्रीपत घाणेकर
संदीप यशवंत गोवळकर
संजय गणपत साळवी
दिपक केशव शिगवण
अनिल गणपत कुळे
सचिन यशवंत गोवळकर
प्रकाश भिकू घाणेकर
शशिकांत नथुराम शिंदे
राजपाल गजानन भिडे
सचिन लक्ष्मण शिर्के
अजित वसंत न्यायनिर्गुणे
शामल विनय मोरे
हर्षाली हर्षद जगताप
प्रसाद अनंत चिनकटे
अमित तुकाराम कदम
प्रविण दत्ताराम शिबे
जयवंत वासुदेव मोरे
श्रीकांत शिवराम कदम
सुजित सुरेश शिंदे
सुधीर सिताराम वैराग
संजय बळवंत गोवळकर
संदीप लक्ष्मण तांबट
बाळासाहेब आनंदराव पाटील
रविंद्र रामचंद्र कुळये (गुरूजी)
प्रदिप बाळकृष्ण भुवड
संदीप आण्णा कालेकर
मनोहर भिकू जाधव
संजय भरत शिर्के
शमा स्वप्निल चिखले

सदिच्छा जाहिरात

**S V ENTERPRISES**
8 Gharat Ali Alibag- Raigad, 402201
Account Name :- S V ENTERPRISES
Prop-- Vishal Gharat
Phone no.: 9270816464

नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा
आकाश प्रसाद जोग
जोग इंफ्रास्ट्रक्चर्स प्रा. ली.
साधना ब्राह्मण आळी अलिबाग रायगड



“...धर्म व राज्यसत्ता ही वेगवेगळी राहतील. माझ्या धर्माला मी चिटकून राहीन, त्याकरीता मी प्राणत्यागही करीन. पण तो माझा व्यक्तिगत विषय आहे..... तुमच्या माझ्या धर्माची काळजी वाहणे हे राज्यसंस्थेचे काम नाही. तो ज्याचा त्याचा व्यक्तिगत विषय आहे. तुमचा धर्म कोणता असे जर तुम्ही मला विचारलेत तर मी सांगेन, तुम्ही माझे जीवन पाहा. मी राहतो कसा; बोलतो, खातो, बसतो कसा, सामान्यपणे काय मानतो, हे तुम्ही बारकाईने पाहिले पाहिजे. या सर्व गोष्टींची जी गोळा बेरीज माझ्यात आढळेल तोच माझा धर्म होय.”

**– महात्मा गांधी**

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना हुतात्मा दिनी विनम्र अभिवादन!**



**२५ नोव्हेंबर १९४९ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेत शेवटचे भाषण झाले.**

“...माझ्या मते, संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णत: संविधानाच्या स्वरूपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग – जसे की कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, आणि न्यायपालिका निर्माण करून देते. राज्याच्या या विभागांचे कार्य लोक आणि लोकांनी स्वत:च्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष यावर अवलंबून राहणार आहे.”

**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर**


# जलसंपदा कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या, वर्धा.

र.न.डब्लु.डी.ओ./आर.एस.आर/ सी.आर.२६२/९०
डॉ. अडयाळकर भवन, शिवाजी चौक, आर्वी रोड, वर्धा. ४४२ ००१ (फोन नं. ०७१५२ – २४२५७७)




**संस्थेची ठळक वैशिष्ट्ये**

१. सभासद कर्ज मर्यादा रु.५०.०० लक्ष
२. संस्थेचे कार्यक्षेत्र संपुर्ण विदर्भ, मराठवाडा व पुणे जिल्हा
३. संस्थेचे शाखा कार्यालये :– वर्धा, आर्वी, हिंगणघाट, अजनी (नागपूर), सिंचन (नागपूर), चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, अकोला, वाशिम व नांदेड.
संभावित शाखा परभणी, औरंगाबाद, व पूणे
४. सभासदाच्या दिर्घ मुदती कर्जास कर्ज सुरक्षा कवच योजने अंतर्गत संरक्षण
५. अल्प व्याज दरात कर्ज पुरवठा करणारी एकमेव जलसंपदा विभागातील कर्मचाऱ्यांची सहकारी पत संस्था.
६. स्वभांडवलातून कर्जवाटप करणारी संस्था. कर्ज व्याजाचा दर १०. ० टक्के
७. सभासदांचे दुर्धर व खर्चीक आजाराचे औषध उपचार करीता रु.१०.०००/– पर्यंत आर्थिक मदत.
८. जनता अपघात विमा योजनेअंतर्गत सभासदांचा रू. १ लाखाचा अप्पशा प्रिमीयम मध्ये विमा
९. ठेवीवर आकर्षक व्याज दर, जेष्ठ नागरीकांना ०.५० टक्के जादा व्याज दर. (१२ महीनेचे वरील ठेवीकरीता)
१०. सर्व शाखा संगणकीकृत सी.बी.एस. प्रणाली अंतर्गत कामकाज. ११. संस्था स्थापने पासुन सतत ऑडीट वर्ग अ
१२. कर्तव्यदक्ष संचालक मंडळ. १३. सन २०२२–२३ चा नफा रु.४.२५ कोटी. १४. संस्थचा पारदर्शी व्यवहार.
१५. संस्थेच्या कर्मच्याऱ्यांकडून विनम्र व तत्पर सेवा

| | |
|---|---|
| संस्थेची स्थापना | : दिनांक १४–११–१९९० |
| कामकाजास प्रत्यक्ष सुरवात | : दिनांक ०१–०१–१९९१ |
| संस्थेचे सुरवातीचे भाग भांडवल | : रु.१८७००/– |
| संस्थेची सुरवातीची सभासद संख्या | : २०३ |
| संस्थेचे सुरवातीचे कार्यक्षेत्र | : वर्धा जिल्हा |

**संस्थेची सांपत्तीक स्थिती दि. ३०/०९/२०२३**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) सभासद संख्या | ५८२३ | २) खेळते भांडवल | २००.०० कोटी | ३) वसुल भाग भांडवल | ३६.९९ कोटी |
| ४) निधी व तरतुदी | १२.१६ कोटी | ५) ठेवी | १४३.३६ कोटी | ६) कर्जे | १७८.८८ कोटी |
| ७) गुंतवणूक | १४.३८ कोटी | ८) नफा | २.१० कोटी | | |

**संचालक मंडळ** : अध्यक्ष : **श्री. गौरव बुधोलीया** । उपाध्यक्ष : **श्री. पंकज आगलावे** । कार्यलक्षी संचालक : **ओंकार धावडे**

श्री. केशव जवादे, श्री. हेमंत ठाकरे, श्री. श्रीकांत मस्के, श्री. छगनलाल गायधने, श्री. मिथुन चांदोरकर, श्री. दत्तराव मस्के, श्री. विक्रम पाटील, श्री. सचिन देवगीरकर, श्री. सुनिल गजबे, श्री. गोपाल अवचार, श्री. गोविंद तागडे, श्री. विजय काकडे, श्री. मधुसंदन टेळकीकर, श्री. विशाल जिरवणकर, श्री. नितीन तराळे, श्री.रामेश्वर पवार, श्री. साहेबराव अंभोरे, श्रीमती आरती तायडे, श्रीमती दिप्ती सबाने. श्री. किशोर ढवळे, श्री. अश्वीन कठाणे

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक पहिला, ५ जानेवारी २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/–
Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 1, 5th January 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

www.ritindia.edu

Kasegaon Education Society's
RAJARAMBAPU INSTITUTE OF TECHNOLOGY
An Empowered Autonomous Institute, Affiliated to Shivaji University, Kolhapur
Rajaramnagar, Sakharale (Islampur) Tal. Walwa, Dist. Sangli, Maharashtra, India 415414



40 YEARS OF EXCELLENCE
40+ ACRES GREEN CAMPUS
90%+ PLACEMENTS




New most **Trending & Advanced** programs

- B. Tech in **Computer Science & Engineering** (Artificial Intelligence & Machine Learning)
- B. Tech in **Mechatronics Engineering**
- B. Tech in **Robotics & Automation**

Under Graduate **B.Tech**
- Civil Engineering
- Computer Engineering
- Computer Science and Engineering (Artificial Intelligence and Machine Learning)
- Computer Science and Information Technology
- Electrical Engineering
- Electronics &Telecommunication Engineering
- Mechanical Engineering
- Mechatronics Engineering
- Robotics And Automation

Post Graduate **M.Tech/MBA**
- Structural Engineering
- Construction Management
- Design Engineering
- Electronics Engineering
- Computer Science and Engineering
- Power Systems & Power Electronics
- Mechanical Engineering (Thermal Engg.)
- Master of Business Administration (MBA)
- MBA (Innovation Entrepreneurship & Venture Development)

**Diploma** Courses
- Automobile Engineering
- Civil Engineering
- Computer Engineering
- Computer Hardware & Maintenance
- Electrical Engineering
- Mechanical Engineering

**Ph.D.** Courses
- Mechanical Engineering
- Civil Engineering
- Electrical Engineering
- Electronics & Tele. Engineering
- MBA

director@ritindia.edu 02342-220329/9970700800 /Rajarambapu Institute of Technology

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली–४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.